**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ९ * अंक ३३० * * मुंबई * | रविवार, दिनांक ३० मार्च २०२५ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)







# प्रत्येक प्रकरणात वाद कशाला?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**
वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून सगळ्यांशी चर्चा करावी लागणार आहे. त्यासाठी होळकर यांनी पैसे दिले आहेत, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वांशी चर्चा करून, वाद न करता मार्ग निघू शकतो. प्रत्येक गोष्ट वाद केलाच पाहिजे का? तर असे काही नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी आज तुळजापूर आणि पंढरपूर येथील मंदिर परिसरात सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून वाद निर्माण करून काहीही होणार नाही. धनगर समाज एकीकडे आणि मराठा समाज एकिकडे हे कशासाठी? हे अतिशय अयोग्य आहे. या विषयावर बसून मार्ग काढता येईल, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## 'वाघ्या' कुत्र्याच्या शिल्पावरून फडणवीसांनी सुनावले....



या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संभाजी महाराज यांना अनेक वेळा भेटण्याची वेळ दिली आहे. ते माज्याशी फोनवर देखील बोलतात. ते मला येऊन देखील भेटतात. त्यामुळे त्यांना वेळ न देण्याचे काहीही कारण नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

वाघ्या कुत्र्याच्या स्मृती स्थळावरून युवराज संभाजीराजे यांनी देवेंद्र फडणवीस यांना भेटण्याची वेळ मागितली असून त्यांची वेळ मिळाली नसल्याचे म्हटले होते. मात्र ते मला कधीही भेटू शकतात, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा दावा फेटाळला आहे.

# पीएम मोदींचा दौरा



## पोलिसांनी घेतला व्यवस्थेचा आढावा उड्डाणपूल बंद

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी सकाळी नागपूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ९ ते दुपारी १ वाजतापर्यंत ते नागपुरात असतील.

त्यांच्या दौऱ्यानिमित्त कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, शनिवारी शहर वाहतूक पोलिसांनी विविध मार्गांवर वाहतूक व्यवस्थेची तपासणी केली. या दरम्यान सदर आणि सीताबर्डी उड्डाणपूल बंद ठेवून रविवारी येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. या दरम्यान अचानक उड्डाणपूल बंद करण्यात आल्याने नागरिकांना काही चौकांमध्ये वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

जाणकारांच्या मते, रविवारी वर्धा रोडसह शहरातील रस्त्यांवर सामान्यतः वाहनांची संख्या कमी असते. त्यामुळे मोदींचे आगमन ते आरएसएस मुख्यालय, दीक्षाभूमी भेट व माधव नेत्रालयाच्या कार्यक्रमात सामील होतपर्यंत नागरिकांना खूप अधिक अडचणींचा सामना करावा लागणार नाही.

शनिवारी वाहतूक विभागाकडून पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या वेळी वाहतूक व्यवस्था कशी असेल याची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी बर्डी, आरबीआय चौक, वर्धा रोड, बैद्यनाथ चौक येथे वाहनांच्या रांगा लागल्या. पंतप्रधानांच्या सुरक्षा कारणास्तव काही मार्ग तात्पुरते बंद केल्याने पर्यायी रस्त्यांवर वाहतूक वाढली व जामची स्थिती निर्माण झाली. शहरातील सर्वात व्यस्त भागांपैकी एक बर्डी चौकात वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. आरबीआय चौकातही जाम लागल्याने प्रवाशांना गंतव्यावर वेळेत पोहोचता आले नाही.

**बैरिकेडिंग व पर्यायी मार्ग**

पंतप्रधान मोदी विमानतळावरून थेट आरएसएस मुख्यालयात जातील. त्यांचा ताफा वर्धा रोड, रहाटे चौक, काँग्रेसनगरमार्गे महालकडे जाईल. पोलिसांनी शनिवारपासूनच अनेक ठिकाणी बैरिकेड्स लावले आहेत.

# बळीसंख्या १ हजारापेक्षा अधिक




■ **वृत्तसंस्था, नायपिडॉ, दि. २९ :**
शुक्रवारी झालेल्या ७.७ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपानंतर म्यानमारमध्ये मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आहे. मृतांचा आकडा १० हजारांपेक्षा जास्त असू शकतो. ही भीती युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सव्हने व्यक्त केली आहे. भूकंपाचे धक्के थायलंड, बांगलादेश, चीन आणि भारतापर्यंत जाणवले.

म्यानमारच्या लष्करी सरकारने मृतांची संख्या १,००२ वर पोहोचल्याचे म्हटले आहे, तर २,४०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दुसरीकडे, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये एक ३० मजली इमारत कोसळली आहे. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे.

शुक्रवारी सकाळी ११:५० वाजता म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. म्यानमार आणि थायलंडमध्ये गेल्या २०० वर्षांतील हा सर्वात मोठा भूकंप आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या विध्वंसामुळे म्यानमारच्या ६ राज्यांमध्ये आणि संपूर्ण थायलंडमध्ये आणीबाणी लागू करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी म्यानमारमध्ये पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.१ मोजण्यात आली.

## संयुक्त राष्ट्रांकडून ४३ कोटी रुपयांची मदत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :**
भूकंपानंतर, भारताने १५ टन मदत साहित्य आणि ८० एनडीआरएफ बचाव कर्मचाऱ्यांची टीम म्यानमारला पाठवली आहे. त्याला 'ऑपरेशन ब्रह्म' असे नाव देण्यात आले आहे. त्याच वेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार पीपल्स गव्हर्नमेंटचे प्रमुख जनरल मिन आंग ह्लाईंग यांच्याशी चर्चा केली.

पंतप्रधान म्हणाले की, जवळचा मित्र आणि शेजारी म्हणून भारत या कठीण काळात म्यानमारच्या जनतेसोबत खंबीरपणे उभा आहे.

संयुक्त राष्ट्रांनी म्यानमारला मदत कार्यक्रम सुरू करण्यासाठी ५ दशलक्ष डॉलर्स (४३ कोटी रुपये) दिले. रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाने १२० बचाव कर्मचारी आणि आवश्यक साहित्य घेऊन दोन विमाने पाठवली. चिनी बचाव पथक प्रथम पोहोचले. हाँगकाँग, सिंगापूर आणि मलेशिया देखील बचाव पथके पाठवतील.

# १६ नक्षलवाद्यांना कंठस्नान

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २९ :**
छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील केरलापालच्या जंगल परिसरात सुरु असलेल्या चकमकीत १६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. आज, सकाळी ८ वाजतापासून ही चकमक सुरु होती. मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते, अशी शक्यता छत्तीसगड पोलिसांनी वर्तवली आहे.

जिल्ह्याच्या केरलापाल जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. यावरून सुकमा पोलीस दलाचे डीआरजी पथक आणि बिजापूर जवानांनी २८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबविले होते. दरम्यान, २९ मार्चला सकाळी ८ वाजताच्या सुमारास पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाली.
यावेळी दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. यात १६ नक्षलवादी ठार झाले. तर दोन डीआरजी जवान जखमी झाल्याची माहिती आहे.













> महत्त्वाचे

## श्रीराम नवमीनिमित्ताने भव्य सत्संग सोहळा



**नाशिकरोड ।** अखिल भारतीय चैतन्य साधक परिवाराच्या नाशिक शाखा समितीने गतवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य श्री गीता रामायण सत्संग सोहळ्याचे आयोजन ४ ते ६ एप्रिल या कालावधीत तपोवनातील राष्ट्रसंत श्री जनार्दन स्वामी आश्रमात केले आहे. प.पू.संत श्री लक्ष्मण चैतन्य बापूजी यांनी स्थापन केलेल्या चैतन्य साधक परिवार, जळगाव जिल्ह्यातील श्री वृंदावन धाम, पाल (ता.रावेर) या आश्रमाच्या माध्यमातून गौशाळा, गुरुकुल, आरोग्य शिबिर, ध्यान साधना, साधना शिबिर, भक्ती सभा इत्यादींचे आयोजन केले जाते. ४ आणि ५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता सत्संग सोहळा आणि महाप्रसाद होईल. ६ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजता भव्य शोभायात्रा आणि सकाळी १० वाजता सत्संग सोहळा आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. सर्व ग्रंथांचा सार श्रीमद भगवतगीता आहे. यावर परमपूज्य बापूजी भाष्य करीत. श्रीमद् भगवतगीता प्रमुख ग्रंथ मानून याबरोबरच श्रीरामायण, श्रीमत भागवत, महाभारत, उपनिषद श्रीरामचरितमानस, भारतातील सर्व संतांची ग्रंथसंपदा आणि विचार मुखोदगत असणारे प.पू.बापूजी आणि त्याच्यानंतर हाच वारसा पुढे चालवणारे आश्रमाचे गादीपती तथा महाराष्ट्र संत समितीचे प्रदेशाध्यक्ष श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या श्री गीता रामायण सत्संग सोहळ्यात नाशिक नगरीतील साधक, भगवंत प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन अखिल भारतीय चैतन्य साधक परिवारच्या नाशिक समितीने केले आहे.

## मनाचे कंगोरे उलगडल्याशिवाय माणूस कळत नाही : खडताळे

**नाशिक ।** मानवी मन हे सदैव विचार करत राहतं. या मनात अनेक प्रकारचे विचार येतात. या मनाचे कंगोरे उलगडल्याशिवाय माणूस आपलासा होऊ शकत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक





देवीदास खडताळे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही...' या उपक्रमात 'कंगोरे मनाचे' या पुस्तकावर देवीदास खडताळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री सुनंदा पाटील होत्या. खडताळे पुढे म्हणाले की, कवी मनाचा आशय घेऊन मनात सुरू असलेल्या भावना उलगडून दाखवत असतो. मन पावसासारखे असते... कधी रिमझिम तर कधी सरीसारखे बरसत असते. मनात श्रद्धा असायला हवी. आपण दुसऱ्याला समजून घेतले तर एकमेकांमध्ये सहजपणे एक वेगळं नातं निर्माण होतं. दु:ख विसरण्यासाठी आयुष्यातील कोडे दूर करण्यासाठी आपल्यात वैचारिक भावना निर्माण झाली पाहिजे, असे सांगून त्यांनी काही कविता सादर केल्या. अजित कुलकर्णी, विश्वास मोरे या भाग्यवान विजेत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन, अशोक पाटील यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.१) ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुक्तेश्वर मुनशेट्टीवार 'चळवळ्या माणूस' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

## तरुणाला जीवे मारण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**सिडको ।** प्लम्बिंग काम करणाऱ्या तरुणाला कोयत्याचा वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी अक्षय ज्ञानेश्वर पाटील (वय २३, रा. अंबड) हा तरुण प्लम्बिंगचे काम करतो. पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास तो घरी होता. त्यावेळी आरोपी ऋषिकेश साहेबराव नवले (रा. उपेंद्रनगर, अंबड) व त्याचा एक अनोळखी इसम असे दोघे जण फिर्यादी पाटील याला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हातात कोयता घेऊन घराबाहेर उभे राहिले. आरोपी ऋषिकेश नवले याने घराचा दरवाजा तोडण्याच्या उद्देशाने दरवाजावर कोयता मारून त्याचे नुकसान केले, तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देऊन खिडकीवर कोयत्याने वार करून खिडकीच्या काचा फोडल्या. त्यास प्रतिकार केला असता फिर्यादीच्या हातावर कोयता मारून दुखापत केली व जाताना दोन्ही आरोपींनी पाटील याच्या घरावर दगडफेक करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुहास मोहेंदीकर यांचे निधन



**नाशिक ।** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक (तृतीय परिक्षा उत्तीर्ण) राम मंदिर आंदोलनातील सहभागी सुहास मोहेदिकर यांचे शनिवारी (दि. २९) पहाटे १ वाजता इंदिरानगर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम येथे अंतिम संस्कार करण्यात आले. निधन समयी त्यांचे वय ८१ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, जावई व मुलगी, नातू असा परिवार आहे.

# गुढीपुढे काढा, सुबक रांगोळी डिझाइन..!

### नववर्षाचे स्वागत करा रंगीबेरंगी रांगोळ्यांनी...!

**गु**ढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस म्हणून साजरा केला जातो. हा सण चैत्र महिन्याच्या पहिल्या तिथीला येतो आणि वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल देतो. या दिवशी घराघरांत गुढी उभारली जाते, नवीन कपडे घातले जातात आणि मंगलमय वातावरणात नववर्षाचे स्वागत केले जाते. या सणाला रांगोळी काढण्याची प्रथा खूप जुनी आहे. रांगोळी ही केवळ सजावटीचे साधन नाही, तर ती समृद्धी आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानली जाते. प्रत्येक मराठी घरात दारासमोर काढलेली सुंदर रांगोळी पाहायला मिळते.

या दिवशी घराघरांत गुढी उभारली जाते, नवीन कपडे घातले जातात आणि मंगलमय वातावरणात नववर्षाचे स्वागत केले जाते. या सणाला रांगोळी काढण्याची प्रथा खूप जुनी आहे. रांगोळी ही केवळ सजावटीचे साधन नाही, तर ती समृद्धी आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानली जाते. प्रत्येक मराठी घरात दारासमोर काढलेली सुंदर रांगोळी पाहायला मिळते. यंदा पाडव्याला दारात किंवा गुढी भोवती काढता येतील. विविध रंगांचा वापर करुन आपण ही गुढीची रंगोळी काढू शकतो. अगदी सोप्या पद्धतीनेही ही रांगोळी काढता येऊ शकते. घराबाहेर थोडी मोठी जागा असेल तर अशी थोडी मोठी रांगोळी काढता येऊ शकते. यामध्ये गडद रंग वापरल्यास ही रांगोळी जास्त उठून दिसते. जर तुम्हाला रांगोळीचे विविध प्रकार काढता येत असतील तर आपण
























अशा प्रकारची सुंदर आखीव - रेखीव भरीव अशी रांगोळी काढून छान सजावट करू शकतो. जर तुम्हाला रांगोळीचे विविध प्रकार काढता येत असतील तर आपण अशा प्रकारची सुंदर आखीव - रेखीव भरीव अशी रांगोळी काढून छान सजावट करू शकतो. पाडव्याच्या सणाला फुलं, आंब्याची पानं, कडूनिंबाची पानं यांना विशेष महत्त्व असतं. रांगोळीत आपण या सगळ्याचा समावेश केल्यास संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या रांगोळीतून दिसून येते. जर तुम्हाला रांगोळी काढता येत नसेल तर तुम्ही आधी खडूने जमिनीवर हवे तसे चित्र किंवा रांगोळी रेखाटून घ्या त्यानंतर त्यावर पांढऱ्या रांगोळीने बॉर्डर भरून मग आता मनपसंत रंग भरा. गुढी भोवती दिव्यांनी आणि रांगोळीने सजावट केल्यास अधिक चांगला लूक येईल. शुभ गुढीपाडवा असा संदेश रांगोळीवर लिहून देखील तुम्ही ही रांगोळी अधिक आकर्षक करता येईल. गुढी, नथ अशा पारंपरिक वस्तू रांगोळी मध्ये रेखाटून तुम्ही तुमची रांगोळी अधिक सुंदर आणि आकर्षक करू शकता. तुम्ही एकाच रांगोळीत अनेक रंगांची उधळण करून देखील अशी विविध रंगी रांगोळी काढू शकता. तुम्ही एकाच रांगोळीत अनेक रंगांची उधळण करून देखील अशी विविध रंगी रांगोळी काढू शकता. जर तुम्हाला अगदी झटपट गुढी पाडव्याची रांगोळी काढायची असेल आणि वेळ कमी असेल तर तुम्ही अशा प्रकारची रांगोळी काढू शकता. यासाठी आवडत्या रंगाची बॅकग्राउंड तयार करून तुम्ही त्यावर अशी एक काठी, कापड आणि तांब्या ठेवून गुढी रांगोळीत देखील गुढी उभारु शकता. तुम्हाला अगदी झटपट गुढी पाडव्याची रांगोळी काढायची असेल आणि वेळ कमी असेल तर तुम्ही अशा प्रकारची रांगोळी काढू शकता. यासाठी आवडत्या रंगाची बॅकग्राउंड तयार करून तुम्ही त्यावर अशी एक काठी, कापड आणि तांब्या ठेवून गुढी रांगोळीत देखील गुढी उभारु शकता.

**– माधुरी पैठणकर, रांगोळी आर्टिस्ट पाथर्डी. (919623728300)**

# मोदी मैदान नव्हे साधुग्राम (कुंभमेळा) मैदान म्हणा...

### राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार पक्ष) मनपा आयुक्तांना निवेदन

**नाशिक ।** पंचवटीतील तपोवन येथील मोकळ्या मैदानावर अनेक साधू-महंत, आखाड्यांचे महंत येथे वास्तव्यास असतात. पुरातन काळापासून ही परंपरा आहे. त्यामुळे संबंधित मैदानाची खरी ओळख ही साधू-महंतांच्या नावानुसार व्हावी. या मैदानाला मोदी मैदान नव्हे साधुग्राम मैदान म्हणून संबोधण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रभू श्रीरामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आपल्या नाशिक शहराला ऐतिहासिक धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा वारसा लाभलेला आहे. अनेक संत, महात्मा तसेच अनेक महापुरुष देखील वास्तव्यास राहून गेले आहे. महत्वाचे म्हणजे अनेक तीर्थक्षेत्रांपैकी एक नाशिक शहराला अधिकचं महत्व प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे दर १२ वर्षांनी पवित्र कुंभमेळा आपल्या नाशिक शहरात भरत असतो, यानिमित्ताने पंचवटीतील तपोवन येथील मोकळ्या मैदानावर अनेक साधू, महंत, मोठमोठे आखाड्यांचे संत महंत येथे वास्तव्यास असतात. पुरातन काळापासून हि परंपरा चालू आहे. त्यामुळे संबंधित मैदानाची खरी ओळख हि साधू महंतांच्या नावानुसार व्हावी. ही अनेक नागरिकांची अपेक्षा होती. तसेच इतर वेळेस याबठिकाणी वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या सभा देखील आयोजित होत असतात, त्यामुळे संबंधित मैदानाला कोणत्याही राजकीय पक्षाच्या व्यक्तीचे नाव न देता. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने तपोवन येथील मोकळ्या मैदानाला 'साधुग्राम (कुंभमेळा) मैदान' म्हणून कायमस्वरूपी नामकरण करावे. तसेच या नावाचा मोठा फलक देखील लावण्यात यावा. जेणेकरून सर्व पर्यटक व यात्रेकरूंना समजेल की या ठिकाणापासून कुंभमेळ्याला दरवर्षी सुरुवात होते. राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने यासंदर्भात आयुक्त मनीषा खात्री यांना निवेदन देण्यात आले.वनिवेदनाची दखल घेऊन या मैदानाला 'साधुग्राम (कुंभमेळा) मैदान' म्हणून घोषित करून मोठा नामफलक लावण्यात यावा अन्यथा राष्ट्रवादीच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर जिल्हा कार्याध्यक्ष किरण पानकर, वाहतूक तालुकाध्यक्ष विलास धात्रक, उत्तर महाराष्ट्र ओबीसी उपाध्यक्ष चेतन जगताप, पंचवटी ओबीसी अध्यक्ष ललित ठेंगे, उपाध्यक्ष सुनील ओसवाल, लेवेश ठेंगे, दीपक कुलकर्णी, निखिल गायकवाड, रोहन जगताप, शुभम सांगळे, राहुल काळे, किशोर फसाळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# इगतपुरी तालुक्याचे भूषण

## १२ वर्षे वयाचा 'मन्वंतर' ठरला पहिला राजमान्य बालशाहीर

(लक्ष्मण सोनवणे यांजकडून)

**बेलगाव कुऱ्हे ।** घोटीसारख्या ग्रामीण भागात इयत्ता सहावीत शिकत असतांना आईवडील आणि संपूर्ण परिवाराच्या मार्गदर्शनाने इगतपुरी तालुक्यातील १२ वर्ष वयाचा पहिला बालशाहीर घडला आहे.



महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे वाघेरे येथे आनंदतरंग फाउंडेशनतर्फे शाहिरी प्रशिक्षण शिबिरात बालशाहीर मन्वंतर बाळासाहेब जाधव याला सूचना व प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रीय कार्यक्रम अधिकारी सदाशिव मलखेडकर आणि आयोजक शाहीर उत्तम गायकर यांनी शाहीर पदवीचे प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. लोप पावणाऱ्या लोककला जतन करण्यासाठी इगतपुरी तालुक्यातील पहिला बालशाहीर मन्वंतर जाधव याचे योगदान इगतपुरी तालुक्याला लाभणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. मन्वंतरचे इगतपुरी तालुक्यात सर्वत्र कौतुक सुरु असून, लवकरच त्याच्या दमदार पहाडी आवाजातील कार्यक्रमांचा सर्वांना आस्वाद घेता येणार आहे. त्याच्या यशाबद्दल इगतपुरी तालुक्यात त्याचे अभिनंदन सुरु आहे. संस्कृती रक्षणासाठी सरसावलेल्या जाधव परिवाराने मन्वंतरच्या यशाबद्दल जल्लोष व्यक्त केला आहे. बदललेल्या काळामध्ये शाळांमध्ये होणारे स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि गाण्यांच्या स्पर्धेमध्ये संस्कृती जपणाऱ्या गोष्टींचा अभाव आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या कार्यक्रमांमुळे नितिमूल्ये धोक्यात आली आहेत. याचा दुष्परिणाम नव्या पिढीला भोगावा लागणार आहे. या परिस्थितीत शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी व्हायचे असेल तर समाजाला दिशा देणाऱ्या गाण्याचे किंवा कलेचे सादरीकरण व्हावे अशी अपेक्षा मन्वंतरचे वडील बाळासाहेब हरिभाऊ जाधव आणि आई विद्या तथा मनीषा बाळासाहेब जाधव यांची होती. त्यानुसार मन्वंतर याने आईवडिलांचे मार्गदर्शन, आजी लंकाबाई लक्ष्मण नाठे यांच्या सहकार्याने शाळेतील कार्यक्रमासाठी तयारी पोवाड्याची तयारी केली. तयारी करतांना आईवडील, आजी, बहीण प्रज्ञा, चिमुकला भाऊ योगी यांना प्रेक्षक म्हणून समोर बसवत पोवाड्याची सर्वोत्तम तयारी केली. शाळेत त्याचा पोवाडा सर्वांना मनापासून भावला. त्यानंतर जाधव परिवाराने त्याला लागलेल्या पोवाडे गायनाच्या छंदाचे जतन केले. दमदार आवाज, लयदार सादरीकरण, उत्तम पाठांतर करून मन्वंतर तयारी करीत असला तरी त्याला सुयोग्य व्यासपीठ मिळत नव्हते. अशावेळी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे वाघेरे येथे आनंदतरंग फाउंडेशनतर्फे शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन शाहीर उत्तम गायकर यांनी केले. हे समजताच जाधव परिवाराने मन्वंतरला शिबिरात पाठवण्याचे निश्चित केले. त्याच्यासाठी वयोवृद्ध आजी लंकाबाई लक्ष्मण नाठे यांनी संपूर्ण दहा दिवस स्वतः हजर राहून कष्ट घेतले. या शिबिरात १२ वर्ष वयाचा एकमेव शाहीर फक्त मन्वंतर हाच आलेला होता. मन लावून त्याने शिबिराचा फायदा घेऊन स्वत:तील कला अधिकाधिक विकसित केली. शिबिराच्या निमित्ताने इगतपुरी तालुक्यातील १२ वर्ष वयाचा पहिला शाहीर होण्याचा बहुमान मन्वंतर जाधव याने पटकावला. महाराष्ट्र शासनाची राजमान्य शाहीर पदवी मिळवून त्याने तालुक्याचे नाव उंचावलेले आहे. लवकरच त्याचे कार्यक्रम इगतपुरी तालुकाभर सुरु होणार आहेत.

# आदिवासीच्या शबरी योजनेचे २४५ कोटी द्या : खा. राजाभाऊ वाजे

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** भारतात व राज्यात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विकासाच्या समान संधी त्यांच्या पर्यंत पोहचाव्या यासाठी अनेक योजना राबविल्या जातात. मात्र अंमलबजावणी आणि प्रशासनिक अनास्थेमुळे या योजना लाभार्थ्यापर्यत पोहचत नाही. तसेच राज्यात केंद्र आणि राज्याच्या एकत्रित निधीतून योजना राबवल्या जातात. मात्र केंद्र सरकारकडे असलेला तब्बल ९६ कोटीहून अधिकचा निधी केंद्राच्या लाल फितीत अडकल्यामुळे योजनाचा लाभ लाभार्त्यापर्यंत पोहचत नाहीये. यासंदर्भात खासदार राजाभाऊ वाजे लोकसभेत गरजले आणि त्यांनी हा निधी तात्काळ वर्ग करावा अशी मागणी केली.

आदिवासीच्या विकास आणि सक्षमीकरणसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळ आदिवासी लि. च्या माध्यमातून दिला जाणारा २०० कोटींच्या निधी मध्ये वाढ करून तो ५०० कोटी रुपये करावा अशी देखील मागणी यावेळी खासदार राजाभाऊ वाजे यांनी केली.

सध्या मिळणाऱ्या निधीच्या माध्यमातून उद्दिष्ट साध्य होत नाही असे दिसत असल्याने या निधीत वाढ करावी अशी मागणी खासदार वाजे यांनी केली.

# इंदोरवाला ईएनटी हॉस्पिटलचा ३० मार्चला विल्होळीत भव्य शुभारंभ

**नाशिक ।** शहरातील नावाजलेले व ज्येष्ठ कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. शब्बीर इंदोरवाला यांच्या मार्गदर्शनातून विल्होळी येथे इंदोरवाला ईएनटी हॉस्पिटल उभारले असून, हे आशियातील सर्वात मोठे ईएनटी हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलचा औपचारिक शुभारंभ ३० मार्चला सकाळी ११ वाजून ३० मिनिटांनी होणार आहे. पद्मविभूषण व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, या कार्यक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनंट जनरल डॉ.माधुरी कानिटकर यांची उपस्थिती राहणार आहे.

इंदोरवाला ई.एन.टी. हॉस्पिटल हे भारतातील अग्रगण्य ई.एन.टी. हॉस्पिटल असून कान, नाक, घसा संबंधित विकारांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानासह येथे उपचार केले जातात. यापूर्वीदेखील उपचार सुविधा उपलब्ध करताना अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करुन देत रुग्णांना आरोग्यसेवा देण्याचा हॉस्पिटलचा नेहेमीच प्रयत्न राहिला आहे. अचूक निदान, प्रभावी तंत्रज्ञान व कार्यप्रणालीतील पारदर्शकता यामुळे हॉस्पिटलने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा विश्वास संपादन केलाआहे. कान-नाक-घसा यांच्याशी संबंधित, तसेच साध्या घसादुखी पासून मेंदूपर्यंत जाणाऱ्या गाठीसारख्या किचकट शस्त्रक्रियादेखील होतात.



### सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध

महाराष्ट्र राज्य शासनाच्या कर्मचार्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस व रिएम्बर्समेंट सुविधा उपलब्ध आहे. पूर्ण ऑडिओलॉजिकल सेटअप, स्पीच थेरपी, एव्हीटी उपलब्ध आहे. गरीब असो किंवा श्रीमंत प्रत्येकासाठी हॉस्पिटलीमध्ये उपचार उपलब्ध आहेत. आर्थिक दृष्ट्या गरजू रुग्णांसाठी इंदोरवाला चॅरिटेलब ट्रस्टद्वारे आर्थिक मदत उपलब्ध होते. हॉस्पिटलमध्ये ४० टक्के बेड त्यांच्यासाठी राखीव ठेवले आहेत. १८ वर्षाआतील लहान मुलांसाठी आरबीएसके तसेच २ वर्षांच्या आतील बालकांसाठी मोफत कॉक्लेअर इम्प्लांट सर्जरी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असेल. कान, नाक, घसा आणि ईएनटी संबंधित सर्व समस्या एका छताखाली उपलब्ध झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची सुविधा होणार आहे.

### आशियातील सर्वात मोठे ईएनटी हॉस्पिटल

डॉ.शब्बीर इंदोरवाला म्हणाले, नाशिककरांनी गेल्या ४२ वर्षात आम्हाला खूप प्रेम आणि सहकार्य केले आहे. नाशिकसाठी आणि पूर्ण देशासाठी काही करावे, या प्रेरणेने हे भव्य हॉस्पिटलचे स्वप्न हाती घेतले होते. जे आता वास्तवात आले आहे. विल्होळी येथील सर्वे नंबर ८२ येथे उभारलेल्या हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधांनी सुसज्ज इमारत असून ईएनटीच्या सर्व उपशाखा स्वतंत्रपणे विकसीत केल्या आहेत. यामध्ये कान विकार विभाग, नाक विकार विभाग, घसा विकार विभाग, ईएनटी आणि हेड-नेक कॅन्सर विभाग, बाल ईएनटी सर्जरी विभाग, ईएनटी प्लास्टिक सर्जरी विभाग, ऑबस्ट्रक्टिव्ह स्लिप ॲप्नीया (घोरण्याच्या समस्या )उपचार विभाग, न्यूरो ओटोलॉजी आदी विभाग असतील. हॉस्पिटलमधे सुसज्ज श्रवण यंत्र विभाग आहे जेथे उत्तम दर्जाचे, रुग्णाच्या गरजेनुसार त्याच्या फ्रीक्वेन्सीला मॅच करुन दिले जाते. डेमो रुम, एका दिवसात कानाचा मोल्ड, ऐकण्याची रियल टाइम मेजरमेंट अशा सुविधा देखील आहेत. उच्च दर्जाच्या उपकरणांसह सुसज्ज ओपीडी आणि डायग्नोसिस सेंटर पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी जिथे एक्सरे, सिटी स्कॅन आहे. डॉक्टरांकडून मायक्रोस्कोप वापरून अचूक निदान आणि उपचार, छोट्या प्रक्रिया ओपीडीमध्ये होऊ शकतात. अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, आयसीयु, विशेष दक्षता कक्ष, पर्यावरणपूरक रूम्स आणि आयसीयूतील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी देखील आरामदायी सुविधा उपलब्ध आहेत.

## महत्त्वाचे

### महामहीम दीदी चित्रपटाचा नाशिकमध्ये प्रीमियर

**इंदिरानगर ।** देशाच्या प्रथम आदिवासी महिला राष्ट्रपती असलेल्या द्रौपदी मुर्मु यांच्या



जीवनावर आधारित "महामहीम दीदी" या चित्रपटाचा शनिवारी (तारीख 29)अकराव्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रीमियर संपन्न झाला. याच चित्रपटाला दादासाहेब फाळके जन्मभूमी पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती विश्वविद्यालयाच्या केंद्रात देण्यात आली. गुरुदक्षिणा हॉल येथे सकाळी दहा कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी प्रजापिता ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या उपक्षेत्रीय संचालिका वासंती दीदी चित्रपटाच्या निर्माता प्रभा मिश्रा दिग्दर्शक पंपोष मिश्रा विना दीदी आणि मुकेश कनेरी यावेळी उपस्थित होते. ब्रह्मकुमारी उज्वला दीदी यांनी संस्थेचा परिचय तर ब्रह्मकुमारी दिलीप भाई यांनी सूत्रसंचालन केले या चित्रपटाच्या प्रदर्शनाद्वारे फेस्टिवलचे उदघाटन होणार असल्याचे मुकेश कनेरी यांनी सांगितले. प्रदर्शनात इतर 75 चित्रपटांचे स्क्रीनिंगहोणारआहे.

### नाशिक एज्युकेशन सोसायटीचा १०३ वा वर्धापनदिन

**नाशिक ।** महाराष्ट्रातील नामांकित नाशिक एज्युकेशन सोसायटीचा १०३ वा वर्धापन दिन १ एप्रिल २०२५ रोजी परशुराम सायखेडकर नाट्यगृहात सकाळी १० वाजता संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा. दिलीप फडके तर विशेष अतिथी म्हणून सकाळ माध्यम पुणे समुहाचे मुख्य संपादक,विचारवंत सम्राट फडणीस यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. वर्धापनदिन दिनाच्या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, ॲड. जयदीप वैशंपायन, कार्यवाह राजेंद्र निकम, शिक्षक मंडळ अध्यक्ष नंदा पेटकर, शि. मंडळ उपाध्यक्ष राजेंद्र कापसे, सहकार्यवाह शैलेश पाटोळे,उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी,उत्सव समिती निमंत्रक प्राजक्ता क्षीरसागर, सर्व संस्था पदाधिकारी, उत्सव समिती सदस्य यांनी केले आहे.

### सिडकोत गुढीपाडवा महोत्सव उत्साहात

**सिडको ।** नाशिक महापालिका आणि नववर्ष स्वागत समितीच्या विद्यमाने शुक्रवारी (दि. 28) नवीन नाशिक मधील संभाजी स्टेडियम येथे भव्य महावादनाचा कार्यक्रम पार पडला. नाशिक जिल्ह्यातील ३० ढोल पथकांसह १५०० ढोल वादकांनी सामूहिक वादन करत महोत्सवाला खास रंगत आणली. गुरुवारी रात्री आठ ला दहा वाजता प्रारंभ झाला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र घेताने झाली त्यानंतर ध्वजप्रदर्शन आणि नाशिक ढोल वादनाने सोहळ्याला सुरुवात झाली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त महा रांगोळी आणि महावादन त्यांना समर्पित करण्यात आले शिवकालीन शास्त्रविद्या प्रात्यक्षिक वारसा या विशेष कार्यक्रमातून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहण्यात आली तसेच अंतरनाद हा कार्यक्रम प्रसिद्ध तबलावादक पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांना समर्पित करण्यात आला. कार्यक्रमास आमदार सीमा हिरे, महेश हिरे, राजेंद्र फड, भाजप महिला जिल्हा अध्यक्ष सोनाली पवार, संदीप मंडले, आबा पवा, माजी नगरसेवक मुकेश शहाणे, माजी नगरसेविका प्रतिभा पवार, किरण दराडे, कावेरी घुगे, गोविंद घुगे, बाळा दराडे, उद्योजक कौशिक पटेल, रश्मी हिरे, सोनाली मंडलेच्या आधी सह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नाशिककरांनी या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला नववर्षाच्या स्वागताचा हा पारंपारिक आणि भव्य सोहळा नागरिकांसाठी आनंदाचा ठरला.

### पिंक ई रिक्षासाठी महिलांनी अर्ज करावे

**नाशिक ।** महिला व बालविकास विभागातर्फे गरजू महिलांना पिंक ई रिक्षा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरासाठी १००० महिला लाभार्थ्यांना हा लाभ देण्यात येणार आहे. पात्र महिलांनी अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे, अशी माहिती महिला व बालविकास अधिकारी सुनील दुसाने यांनी दिली आहे. योजनेअंतर्गत लाभार्थी वय 20 ते 40 वर्षे ऐवजी सुधारित लाभार्थी वय 20 ते 50 असे करण्यात आले आहे. पिंक रिक्षासाठी करावयाचे अर्ज व आवश्यक कागदपत्रांची यादी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय व डब्ल्यू डब्ल्यू डॉट नासिक डॉट गव्हर्मेंट डॉट इन या संकेतस्थळावर महापालिका, नाशिक मुख्य कार्यालय व जवळच्या अंगणवाडी केंद्रात उपलब्ध आहेत. इच्छुक महिलांनी अर्ज आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय नासरडी पुलाजवळ नाशिक-पुणे रोड, नाशिक येथे सादर करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# महापालिकेत वारसा हक्काने ४४ सफाई कामगारांना नियुक्ती

## गुढीपाडवा गोड झाला; म्युन्सिपल कर्मचारी सेनेच्या पाठपुराव्याचे यश

**नाशिक ।** नाशिक महापालिकेच्या दिवंगत, सेवानिवृत्त आणि स्वेच्छानिवृत्त सफाई कामगारांच्या रिक्तपदी लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने ४४ जणांची घनकचरा व्यवस्थापन विभागात सफाई कामगार या पदावर नियुक्ती करण्यात आल्याने सफाई कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मुन्सिपल कामगार कर्मचारी सेनेने सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे हे यश असल्याचे अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर यांनी सांगितले. सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी स्तर रु.१५,००० -४७,६०० मधील प्रारंभिक मूळ वेतन रु.१५,००० या दरमहा एकुण वेतनावर प्रथमतः दोन वर्ष परिविक्षाधिन कालावधीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे महापालिकेने जारी केलेल्या नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे. नाशिक, घनकचरा व्यवस्थापन विभागातील सेवानिवृत, दिवंगत आणि स्वेच्छानिवृती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना तातडीने लाड व पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती द्यावी या आशयचे निवेदन म्युन्सिपल कर्मचारी कामगार सेनेने महापालिका आयुक्तांना देऊन या मागणीचा सातत्याने पाठपुरवठा केला होता. गुढीपाडव्याच्या दोन दिवस आधी याबाबतचा निर्णय झाल्याने आणि महापालिका प्रशासनाने वारसा हक्काने 44 सफाई कामगारांना नियुक्ती देण्याचा आदेश काढला. हा एक प्रकारे दुग्ध शर्करा योग आहे. याबद्दल सेनेने मनपा आयुक्त मनीषा खत्री यांचे आभार मानले आहे. दरम्यान नियुक्त झालेले कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पेढे वाटून या निर्णयाचा जल्लोषसाजराकेला.

# पिंपळनेरमध्ये सामाजिक एकीचा संदेश देत इफ्तार पार्टीचे आयोजन



**पिंपळनेर ।** सामाजिक, धार्मिक एकोप्याची परंपरा सदैव राहो, सामाजिक एकता आणि सद्भावनेचा संदेश देण्यासाठी येथील भरत बागुल आणि डॉ. प्रशांत बागुल यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात विविध धर्मीय नागरिक सहभागी झाले होते.

रमजान हा मुस्लिम धर्मीयांसाठी पवित्र महिना असून, या काळात उपवास (रोजा) केले जातात व संध्याकाळी इफ्तारच्या माध्यमातून उपवास सोडला जातो. समाजात बंधुभाव आणि ऐक्य वाढावे या उद्देशाने भरत बागुल व डॉ. प्रशांत बागुल यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन केले. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात एकोप्याचे दर्शन दिसून आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याची गरज आणि त्याचे महत्त्व यावर मनोगत व्यक्त केले.या इफ्तार पार्टीत सुमारे २०० हून अधिक नागरिक सहभागी झाले होते.सामाजिक सलोखा, ऐक्य आणि सौहार्द यांचे दर्शन घडवणाऱ्या या सोहळ्याचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.

# नाशिकच्या अयोध्या रोईंग क्लबच्या रोईंगपटूंनी पटकावले २ पदक



**नाशिक ।** चंदीगड, पंजाब येथे दिनांक २३ते २८ मार्च दरम्यान अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोईंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नाशिकच्या अयोध्या रोईंग क्लबच्या रोईंगपटूनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठचे प्रतिनिधीत्व करतांना उत्कृष्ठ कामगीरी करून रजतपदक आणि कास्य पदकाची कमाई केली.

या स्पर्धेत कृष्णा शेळके आणि राम शेळके या दोन बंधूंनी २ किलोमीटर या प्रकारात सुंदर कामगिरी करून कास्य पदक प्राप्त केले. तसेच टीम इव्हेंटमध्ये कृष्णा शेळके, मोईन शेख, दिगंबर गवळी आणि सुमित गवळी यांनी ५०० मीटर अंतराच्या शर्यतीत अत्यंत चांगले एकत्रित प्रयत्न करून आपल्या संघाला रजत पदक मिळवून दिले. हे सर्व खेळाडू ऑलिंपियन खेळाडू तथा अर्जुन पुरस्कारप्राप्त दत्तू भोकनळ यांच्या मार्गदर्शनाखाली अयोध्या रोईंग क्लब येथे नियमित सराव करतात. दत्तू भोकनळ यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आम्हाला खूप फायदा झाला आणि आमचा आत्मविश्वास वाढला. त्यामुळेच आम्ही चांगली कामगीरी करू शकलो, असे दुहेरी पदक विजेता कृष्णा शेळके यांनी सांगितले.

# चुंचाळे येथे नॅनो गुढीचा अनोखा उपक्रम



**सिडको ।** मनपा शाळा क्रमांक ७३ (मुली), चुंचाळे येथे गुढीपाडवा सणानिमित्त नॅनो गुढी उभारण्यात आली. या अनोख्या उपक्रमाचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थिनींनी नऊवारी साडी नेसून पारंपरिक वेशभूषेत उपस्थित राहून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवले. उत्कृष्ट फलकलेखन मनोज गायकवाड यांनी केले, तर गुढीची आकर्षक रांगोळी मनिषा पाटील आणि रोहिणी अहिरराव यांनी रेखाटली. शाळेच्या आकर्षक सजावटीसाठी सोनाली एखंडे, सुनिता आहेर, पुष्पा पिंगळे, पूजा सावंत व पवार यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमात बाबुराव सांगळे यांनी पौराणिक कथांमधून गुढीपाडव्याचे महत्त्व स्पष्ट केले, तर जयंत येवला यांनी चैत्र शुद्ध प्रतिपदा, धर्माचा अधर्मावर विजय, नवीन मराठी वर्ष (विक्रम संवत) याबाबत माहिती दिली. मुख्याध्यापिका रेखा मोरे यांनी विद्यार्थिनींना गुढीपाडवा सणाच्या शुभेच्छा देत नव्या संकल्पांद्वारे यशस्वी होण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका रेखा मोरे, चंद्रकांत गांगुर्डे, किशोर सोनवणे, जयंत येवला, मनिषा पाटील, बाबुराव सांगळे, अविनाश कोठावदे, पुष्पा पिंगळे, प्रेमसम्राट ब्राह्मणकर, पूजा सावंत, रोहिणी अहिरराव, सुनिता आहेर, सोनाली एखंडे, किरण देवरे, संदीप लोखंडे आणि मनोज गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# नाशिकरोड शहरात प्रथमच

## बाबासाहेबांनी बांधलेला पुस्तकाचा राजगृह बंगला ऐतिहासिक देखावा

**एकलहरे ।** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीवतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक नाशिकरोड येथे नाशिक शहरात प्रथमच राजगृह देखावा अर्थात राजगृह म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पुस्तकांसाठी बांधलेला जगातील पहिला बंगला. या ऐतिहासिक देखाव्याचे भूमिपूजन झाले.

यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे मुख्य संयोजक सुनील काबंळे, समिती अध्यक्ष मुकेश वीर, माजी न्यायाधिश प्रकाश ताजनपुरे, अशोक आव्हाड, संजय पगारे, डॉ. आप्पा भालेराव, कवी. पि. कुमार धनविजय, बलभीम वीर, शैलेश भावसार, अतुल भावसार, तेजस काबंळे, वैजनाथ इंगोले, सखाराम वीर, कुमार बर्वे, गणेश वाघमारे, सचिन पटेल, रोहन अहिरे, सुनिल भावसार, ॲड. पुष्पा ढवळे, अनिता जगताप, जयश्री बस्ते, पल्लवी गवई, मोनुका गांगुर्डे, कुमार बर्वे, शंतनु पगारे, तेजस भंडारी, विश्वनाथ होलीन, भिका गांगुर्डे, भाऊसाहेब जगताप,



आकाश पटेल, शालिग्राम बनसोडे, सनी भालेराव, सागर भालेराव, सागर भंडारी, हर्षवर्धन दिवेकर आदी उपस्थित होते. भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेंना पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले.

देखावा दिग्दर्शक निर्माते आनंद वाघ हे हा देखावा साकारणार आहे. देखावाचे स्वरूप ४०×२० जमिनीपासून २७ फूट उंची असलेली तीन मजली ही इमारत आहे. पहिल्या मजल्या हा १२ × १२ चा असेल. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूर्ती असणार आहे. आणि २७ फुटावर तथागत भगवान गौतम बुद्धांची मूर्ती असेल. तसेच प्रथम मजल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ते स्वतः बसत असलेली. त्या काळातील खुर्ची हि समस्त नागरिकांना दर्शनासाठी ठेवली जाणार आहे.

# शनी मंदिर चांदवड ते श्रीक्षेत्र वरदडी (शनीचे) पायी वारी संपन्न

**चांदवड ।** शनी आमावस्यानिमित्ताने शनिवारी (दि. २९) पहाटे ५ वा. श्रीक्षेत्र कार्तिकेश्वर महादेव / शनि मंदिर चांदवड येथून सद्गुरू श्री चंद्रेश्वरबाबा आणि श्री श्री १००८ महामंडलेश्वर शनिभक्त स्वामी श्री सुकदेव महाराज यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने पायी वारीचे प्रस्थान श्रीक्षेत्र वरदडी (शनीचे) ता.चांदवड. येथे झाले.

शनि महात्म्यात वर्णन असलेल्या कथेनूसार उज्जैनचा राजा विक्रमादित्य यास साडेसाती लागली. ती याच श्रीक्षेत्र वरदडी येथे व साडेसाती मुक्ती मिळाली ती चांदवडच्या प्राचीन शनिमंदिरात. म्हणून हे स्थान 'शनि-साडेसाती-मुक्तीधाम ' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे ही दोन्ही स्थानके शनिभक्तांसाठी पवित्र व विशेष महत्वाची आहेत. साडेसातीच्या काळात अनेक भाविक या दोन्हीही क्षेत्री दर्शनासाठी येत असतात. पायी



वारीचे हे दुसरे वर्ष , मागील वर्षी मोठ्या उत्साहात पायी वारीला अनेकांनी सहभागी होत उत्साह वाढविला. या वर्षीदेखील उत्साहात पायी वारीत अनेक भाविक-भक्त सहभागी झाले. श्रीक्षेत्र वरदडी येथे भाविकांनी तेल अभिषेक व महाआरतीने पायी वारीचा समारोप करण्यात आला. शनिभक्त श्री रघुनाथ आहेर यांनी यावेळी चहापाणी व दुधाची भाविकांना सेवा दिली तर शनिभक्त दीपक रमण पवार राहुड, सचिन रमण पवार यांनी नाष्ट्याची सेवा दिली.

# लांब पल्ल्याच्या सायकलस्वारांसाठी इंडो ॲथलेटिक्स सोसायटीचा उपक्रम

## खेड-शिवापूर येथे मोफत मुक्काम व्यवस्थेचे उद्‌घाटन

**देवळाली कॅम्प ।** पुणे-बेंगलोर महामार्गावरील खेड शिवापूर टोलनाक्यावर शनिवारी (दि. २९) इंडो ॲथलेटिक्स सोसायटी (IAS) तर्फे लांब पल्ल्याच्या सायकलस्वारांसाठी मोफत मुक्काम व्यवस्थेचे उद्‌घाटन करण्यात आले.

जगभरातील सायकलस्वार भारत भ्रमण करत असताना अशा प्रकारच्या सुविधांचा त्यांना मोठा लाभ होतो. आतापर्यंत संस्थेच्या सायकलिस्टनी संपूर्ण भारतभर सायकल भ्रमण केले आहे. पुणे ते कन्याकुमारी, पुणे ते गोवा, पुणे ते हम्पी, पुणे ते गुजरात (सोमनाथ) अशा देशातील सर्वात मोठ्या ग्रुप राइड्स यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या आहेत. मागील दहा वर्षांपासून "अतिथी देवो भव" आणि "वसुधैव कुटुंबकम" या उक्तीप्रमाणे संस्थेतर्फे जगभरातील ॲथलेट्ससाठी वडगाव मावळ, लोणावळा, पुणे, पिंपरी-चिंचवड येथे मोफत




मुक्कामाची सुविधा पुरवली जाते. आता या यादीत खेड शिवापूर हे ठिकाण नव्याने समाविष्ट झाले आहे. उदघाटन सोहळ्याला मान्यवर उपस्थित होते. या उदघाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ उद्योजक अमोल भोंडवे, सचिन वाकडकर, अमोल वाकडकर, गणेश लोहार, महेंद्र दिवाकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच इंडो ॲथलेटिक्स सोसायटीचे गजानन खैरे, गणेश भुजबळ, अजित पाटील, गिरीराज उमरीकर, श्रीकांत चौधरी, अमित पवार यांची उपस्थिती होती. खेड शिवापूर येथील अनुभवी सायकलिस्ट महेश गोगावले आणि रवींद्र कोंडे साहेब यांनी या मुक्काम व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी उचलली आहे. भविष्यात संपूर्ण देशभर अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. देशभर टोलनाक्यांवर अशी सुविधा उपलब्ध होणार आहे.

संस्थेच्या पुढील उपक्रमांबाबत माहिती देताना अमोल भोंडवे यांनी सांगितले की, नॅशनल हायवे ऍथॉरिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून संपूर्ण देशभर टोलनाक्यांवर अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन सादर केले जाईल.

### IAS ला ‘आऊट ऑफ द बॉक्स’ पुस्तक भेट

प्रसंगी भारतीय प्रशासकीय सेवेतील जेष्ठ अधिकारी संकेत भोंडवे यांच्या ‘आऊट ऑफ द बॉक्स’ या पुस्तकाची प्रत संस्थेला भेट देण्यात आली. या कार्यक्रमास मुकुंद दांगट पाटील, संजय बोकील, भारतीय वायुदलातील सुरेश माने सर, चंद्रकांत माने, युवराज पाटील, संदीप परदेशी, सुनील जी चाको, अखिल भारतीय जलतरण संघटनेचे अध्यक्ष कैलास शेट तापकीर, मदन शिंदे, रवींद्र देशपांडे, रिजूल जंत्रे, किरण भावसार, महेंद्र पाटील, नागना इंडी, तानाजीराव मांगडे, अनंत पाटील तसेच नॅशनल हायवे ऍथॉरिटी ऑफ इंडियाचे कर्मचारी उपस्थित होते.



# या कर्जबाजारीपणाचे करायचे काय?

**बँकांना दर वर्षी कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य ठरवून दिले जाते. २०२४-२५ मध्ये ते २० लाख कोटी रुपये होते, परंतु ते जानेवारी महिन्यातच पूर्ण करण्यात आले. शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत अल्प मुदतीच्या कर्जासाठी सात टक्क्यांपेक्षा कमी व्याजदराने कर्ज देण्यात येते. त्यातही वेळेत परतफेड केल्यास, तीन टक्के व्याजदरात अतिरिक्त सूट दिली जाते. मात्र तरीही देशातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा का वाढत आहे?**

परामर्श

**हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार

गेल्या दहा वर्षांमध्ये बँकांनी वाटप केलेल्या कृषी कर्जामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना ७ लाख ३० हजार कोटी रुपयांची कर्जे देण्यात आली होती. आता हा आकडा २०२३-२४ या आर्थिक वर्षात २० लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. बँकांना दर वर्षी कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य ठरवून दिले जाते. २०२४-२५ मध्ये ते २० लाख कोटी रुपये होते, परंतु ते जानेवारी महिन्यातच पूर्ण करण्यात आले. शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत अल्प मुदतीच्या कर्जासाठी सात टक्क्यांपेक्षा कमी व्याजदराने कर्ज देण्यात येते. त्यातही वेळेत परतफेड केल्यास, तीन टक्के व्याजदरात अतिरिक्त सूट दिली जाते. मात्र तरीही देशातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे. आज देशातील शेतकऱ्यांकडे ३३ लाख ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज थकित असून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे सात लाख ३८ हजार कोटी रुपयांची कर्जे थकलेली आहेत, अशी माहिती केंद्रीय वाणिज्यमंत्र्यांनी नुकतीच लोकसभेत दिली. शेड्युल्ड व्यापारी बँकांनी दिलेल्या क्रेडिट कार्डांवरील थकबाकीचे प्रमाण ४२ टक्क्यांनी वाढले आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत ९७,५४३ कोटी रुपयांची कर्जे थकित होती. हेच प्रमाण मार्च २०२१ मध्ये ६८,५४७ कोटी रुपये इतके होते, अशी माहिती सरकारने दिली आहे.

सर्वसाधारण किरकोळ कर्जांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस मुद्दल वा व्याजाची रक्कम थकल्यास ते थकित कर्ज किंवा एनपीए असल्याचे मानले जाते. मात्र किसान क्रेडिट कार्डाअंतर्गत घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी हा पीक हंगामावर अवलंबून असतो. या हंगामाचा काळ राज्यस्तरीय बँकिंग समिती निश्चित करते. कमी दिवसांच्या पिकांचा हंगाम एक वर्षाचा आणि दीर्घ मुदतीच्या पिकांचा हंगाम सामान्यतः दीड वर्षाचा मानला जातो. कर्जवाटपानंतर किसान क्रेडिट कार्डाचे कर्ज तीन वर्षात फेडले न गेल्यास खाते एनपीए होते. गेल्या काही वर्षांमध्ये शेती सोडून ग्रामीण भागातून उद्योग-व्यवसायासाठी शहरात जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. कारण दिवसेंदिवस शेती आतबट्ट्याची ठरू लागली आहे. एक तर शेतीची सरासरी उत्पादकता घटत चालली आहे. संपूर्ण भारतात शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ ६ लाख ४२ हजार हेक्टरने कमी झाले आहे. यात महाराष्ट्रातील सव्वा तीन लाख हेक्टर इतक्या शेतीक्षेत्राचा अंतर्भाव आहे. म्हणजे ५० टक्क्यांहून अधिक कृषिक्षेत्र हे एकट्या महाराष्ट्रातच घटले आहे. राष्ट्रीय महामार्ग, राज्याचे रस्ते आणि रेल्वेमार्ग यासारख्या पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासोबतच शहरीकरण आणि औद्योगिकीकरणासाठी होणारा शेतजमिनीचा वापर वाढला आहे.

मागील पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रातील पेरणीचे क्षेत्रदेखील ३ लाख २४ हजार हेक्टरने कमी झाले आहे. कालबाह्य ठरत असलेले बी-बियाणे आणि उत्पादनपद्धती यामुळे प्रति हेक्टर उत्पादन कमी झाले वा खुंटले आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बियाणांचा पुरेसा पुरवठा होत नाही. त्यामुळे पिकांना कीड वा रोग लागून मोठे नुकसान होते. तसेच खते, कीटकनाशके, अवजारे, यंत्रे, इंधन आणि मजुरी यांचे दर मागील तीन वर्षांमध्ये ३० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढले आहेत. सरकारचे वेगवेगळे अप्रत्यक्ष करही शेतकऱ्यांना भरावे लागत आहेत. शेतकऱ्यांना केंद्र आणि महाराष्ट्र सरकारकडून वर्षाला एकूण बारा हजार रुपयांची मदत मिळते. परंतु ती अत्यंत अपुरी आहे. ग्रामीण भागात मजुरांची चणचण असून मजुरीचे दर शेतकऱ्यांना परवडेनासे झाले आहेत. उत्पादनखर्च भरून निघेल, एवढे भावच शेतीमालाला मिळत नाहीत. उदाहरणार्थ, सोयाबीन शेतकरी आज अडचणीत आहे. शेतकऱ्यांना तोट्यातच शेती करावी लागत असून शेतीच्या आणि अन्य गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे.

शेतकऱ्यांची मुलेबाळे शहरांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी जातात. त्यासाठीही त्यांना कर्ज काढावे लागते. देशातील शेतकऱ्यांकडे ३३ लाख ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज असून यात पीककर्जासह सर्व प्रकारच्या कर्जांचा समावेश आहे. यात सर्वाधिक कर्ज आहे, ते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या डोक्यावर. महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो तो तामिळनाडूचा. तेथील दोन लाख ८८ हजार कृषी खातेधारकांकडे सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांचे कर्ज थकित आहे. त्यानंतर आंध्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगण व केरळ यांचा क्रमांक लागतो. या सर्व राज्यांमध्ये किमान १ लाख ४० हजार कोटी ते तीन लाख कोटी रुपयांच्या कर्जाची थकबाकी आहे. शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी हेक्टरी कृषी उत्पादकता वाढवणे, शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन करणे, कृषी प्रक्रिया उद्योगांना उत्तेजन देणे अशा अनेक आघाड्यांवर सरकारला काम करावे लागेल.

खरे तर, गेल्या दशकात १८ राज्यांमध्ये कृषी कर्जमाफीमुळे कृषी बँकांचे एनपीए ३०-८५ टक्क्यांनी वाढले आहे. युनियन बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि एसबीआयसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी कृषी एनपीए २५ टक्क्यांच्या जवळपास नोंदवले आहेत, तर खासगी बँकांसाठी ते फक्त चार टक्के आहे. यामुळे बँका खरोखरच कर्जाची गरज असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्ज देण्यास कचरतात. हे अर्थव्यवस्थेसाठी चांगले चित्र नाही. बँका 'एनपीए'मुळे ओझ्याखाली दबल्या जातात आणि सरकार त्या न भरलेल्या शेती कर्जाची भरपाई करण्यासाठी पाऊल उचलते, तेव्हा कर महसुलातून तो खर्च भागवला जातो. पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा किंवा शिक्षण यासारख्या गोष्टींसाठी वापरलेला पैसा कर्जमाफीत जातो. यामुळे सरकारच्या बजेटवर ताण येतो आणि त्यांना तूट येते. म्हणजेच तरतुदीपेक्षा जास्त रक्कम खर्च होते.

ही तूट भरून काढण्यासाठी सरकारे अधिक कर्ज घेतात. त्यामुळे दोन गोष्टी होतात. एक म्हणजे, ते वास्तविक वाढीला पाठिंबा न देता प्रणालीमध्ये अधिक पैसे जमा करते. त्यामुळे महागाई वाढते आणि दुसरे म्हणजे सरकार निधीसाठी खासगी क्षेत्राशी स्पर्धा करत असल्याने खासगी व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध होणे कठीण होते. व्याजदर वाढल्याने कर्ज घेणे महाग होते आणि आर्थिक वाढ मंदावते. अर्थतज्ज्ञ आणि अगदी रिझर्व्ह बँकदेखील शेती कर्जमाफीचे समर्थक नाहीत. ते अर्थव्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या क्षमतेशी गोंधळ घालू शकतात.



तज्ज्ञ तमल बंदोपाध्याय यांच्या एका स्तंभातील हे मनोरंजक उदाहरण घ्या. एका अज्ञात भारतीय राज्यातील एका वरिष्ठ मंत्र्याने बँकांना शेतकऱ्यांना कर्ज देण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला तेव्हा रिझर्व्ह बँकेने कसा हस्तक्षेप केला, याचा उल्लेख त्यांनी केला आहे. शेतकऱ्यांचे क्रेडिट स्कोअर तपासल्याशिवाय कर्ज मंजूर व्हावे, अशी मंत्र्यांची इच्छा होती. आणि हे एका राजकीय पक्षाने कर्ज वसूल करणाऱ्या एजंटांना कर्ज बुडवलेल्या शेतकऱ्यांकडून पैसे गोळा करण्यापासून रोखल्यानंतर घडले. शेती कर्जमाफीचा खरा फायदा शेतकऱ्यांना नाही, तर अर्थव्यवस्थेला होतो. पण मते मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पक्षांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा प्रत्यक्षात येतात. याचा अर्थ असा होतो की राजकीय पक्षांकडे शेतकऱ्यांना मदत करण्याचा यापेक्षा चांगला मार्ग नाही? खरं तर, आहे. राजकारण्यांना खरोखर काळजी असेल, तर ते कृषी संशोधन आणि विकास (आर अँड डी) प्रकल्पांमध्ये अधिक गुंतवणूक करू शकतात. २०२३ मध्ये हे कर्ज भारताच्या जीडीपीच्या फक्त ०.४ टक्के होते. गेल्या काही वर्षांमध्ये ही संख्या कमी होत चालली असून खऱ्या कृषी प्रगतीला अडथळा ठरू शकते. ब्राझीलसारखे देश त्यांच्या 'जीडीपी'च्या सुमारे १.८ टक्के रक्कम शेती संशोधन आणि विकासात गुंतवतात, तर चीन ०.६ टक्के रक्कम गुंतवणूक करतो. राजकीय पक्षांनी ही गुंतवणूक वाढवण्याचे आणि शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांना यश येईपर्यंत थेट उत्पन्न आधार देण्याचे आश्वासन दिले, तर कदाचित त्याचे खरे, दीर्घकालीन फायदे होतील. ते केवळ शेतकऱ्यांसाठीच नसतील, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी असतील.

# दुसरे शाहीनबाग करण्याचा इशारा

**वक्फ कायदा, १९९५ मध्ये सुधारणा करण्यासाठी ऑगस्ट २०२४ मध्ये संसदेत विधेयक सादर करण्यात आले. त्यात व्यापक बदल प्रस्तावित करण्यात आल्यामुळे वक्फ मालमत्तांचे नियमन करण्याचे, अशा मालमत्तेशी संबंधित वाद मिटवण्याचे अधिकार सरकारला मिळतील. यामुळे वक्फ विधेयकाविरोधात 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल बोर्डा'ने दुसरे शाहीनबाग करण्याचा इशारा दिला आहे. हा इशारा गांभीर्याने घेण्याची गरज आहे.**

नोंद

**जनार्दन पाटील**

केंद्र सरकार वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करण्याची तयारी करत आहेत. या विधेयकाद्वारे सरकारला वक्फ संपत्ती ताब्यात घ्यायची आहे, असा आरोप विरोधकांचा आहे, तर सरकारचे म्हणणे आहे की वक्फ मालमत्तेचा अधिक चांगला वापर करून मुस्लिम वंचित महिलांना मदत करायची आहे. भाजप खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांनी सुचवलेल्या १४ दुरुस्त्या मंजूर केल्या, तर विरोधकांनी प्रस्तावित केलेल्या ४४ दुरुस्त्या नाकारल्या. एकीकडे संसदेतील विरोधी पक्ष वक्फ विधेयकाला विरोध करत आहेत, तर दुसरीकडे मुस्लिम संघटना विरोधासाठी रस्त्यावर उतरत आहेत. 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'च्या बॅनरखाली अनेक संघटनांनी यापूर्वी याविरोधात आंदोलने केली होती. आता हे आंदोलन राज्य पातळीवर नेण्याची योजना आहे. जवळपास सर्व प्रमुख मुस्लिम पक्ष या विधेयकाच्या विरोधात आहेत. त्यांनी संसदेजवळ जंतरमंतरवर आंदोलन केले. अशीच निदर्शने बिहार आणि आंध्र प्रदेशच्या राजधान्यांमध्ये तसेच देशाच्या बहुतांश भागात आयोजित करण्यात येणार आहेत. वक्फ विधेयकाच्या विरोधात असलेले सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतात; परंतु सर्वोच्च न्यायालयात जाण्याऐवजी धमक्या देत आहेत. लोकशाहीत धमक्या देऊन चालणार नाही. धमक्या दिल्या, तर गुन्हा दाखल होऊ शकतो. केंद्र सरकार 'असंवैधानिक' कायदे आणून मुस्लिमांना लक्ष्य करत असल्याचा आरोप मुस्लिम संघटनांनी केला आहे. त्यांच्या मते सरकार मुस्लिमांना रस्त्यावर उतरण्यास भाग पाडत असून हे विधेयक मुस्लिमांच्या धार्मिक आणि घटनात्मक अधिकारांना गंभीर धोका आहे.



वक्फ मालमत्ता ही सरकारी मालमत्ता नसून धार्मिक ट्रस्ट आहेत आणि हे विधेयक वक्फच्या स्वायत्ततेवरील गंभीर हल्ला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. मुस्लिम मालमत्ता आणि त्यांच्या संस्थांना पद्धतशीरपणे कमकुवत करण्यासाठी हे विधेयक आणले गेले आहे.

या विधेयकामुळे १९९५ च्या विद्यमान वक्फ कायद्यात व्यापक बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे सरकारला वक्फ मालमत्तेच्या व्यवस्थापनात हस्तक्षेप करण्याचे अधिक अधिकार मिळाले आहेत. मुस्लिम संघटना या विधेयकाविरोधात सर्व कायदेशीर, घटनात्मक, नैतिक आणि शांततापूर्ण मार्ग स्वीकारणार आहेत. इस्लामिक परंपरेत, वक्फ ही मुस्लिमांनी समाजाच्या फायद्यासाठी केलेली धर्मादाय किंवा धार्मिक देणगी आहे. अशा मालमत्ता विकल्या जाऊ शकत नाहीत किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापरल्या जाऊ शकत नाहीत किंवा त्यांना वारसा मिळू शकत नाही. त्या कायमचे अल्लाहच्या कारणासाठी समर्पित राहतात. वक्फ मालमत्तेवर पुन्हा दावा करता येणार नाही, अशी भीती त्यांना वाटते. भारतातील या मालमत्तांपैकी मोठ्या प्रमाणात मशिदी, मदरसे, दफनभूमी आणि अनाथाश्रमांसाठी वापरल्या जातात आणि इतर अनेक जागा रिकाम्या आहेत किंवा अतिक्रमण झालेल्या आहेत. वक्फ मालमत्ता सध्या वक्फ कायदा १९९५ च्या अधीन आहेत, जे त्यांचे व्यवस्थापन आणि प्रशासनासाठी राज्यस्तरीय मंडळे स्थापन करणे अनिवार्य करते. या मंडळांमध्ये राज्य सरकारचे नामनिर्देशित सदस्य, मुस्लिम आमदार, राज्य बार कौन्सिलचे सदस्य, इस्लामिक विद्वान आणि वक्फ मालमत्तांचे प्रशासक यांचा समावेश आहे.

सरकार म्हणते की वक्फ बोर्ड भारतातील सर्वात मोठ्या जमीनमालकांपैकी एक आहे. देशभरात किमान ८,७२,३५१ वक्फ मालमत्ता आहेत. त्या नऊ लाख ४० हजार एकरपेक्षा जास्त क्षेत्रात पसरल्या आहेत. त्यांची किंमत १.२ लाख कोटी रुपये इतकी आहे. सशस्त्र दल आणि भारतीय रेल्वेनंतर वक्फ बोर्ड हे भारतातील सर्वात मोठे जमीनमालक आहे. केंद्र सरकारचे म्हणणे आहे की वक्फ मालमत्ता आणि वक्फ बोर्डामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून ते दुरुस्त करण्यासाठी वक्फ दुरुस्ती विधेयक आणले आहे. वक्फ बोर्डात भ्रष्टाचार ही गंभीर समस्या आहे, हे मुस्लिम संघटना मान्य करतात. अतिक्रमण करणाऱ्यांच्या संगनमताने वक्फ जमीन विकल्याचा आरोपही त्यांच्या सदस्यांवर झाला आहे; परंतु टीकाकार असेही म्हणतात की या वक्फ मालमत्तांपैकी मोठ्या प्रमाणात व्यक्ती, व्यवसाय आणि सरकारी संस्थांनी अतिक्रमण केले आहे. त्याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने स्थापन केलेल्या सच्चर समितीने २००६ मध्ये सादर केलेल्या अहवालात वक्फ सुधारणांची शिफारस करण्यात आली होती. समितीच्या मते, या मंडळाकडे आपल्या मालमत्तेचा प्रभावी वापर करून सुमारे १२० अब्ज रुपये वार्षिक उत्पन्न मिळवण्याची क्षमता आहे. सध्याचे वार्षिक उत्पन्न सुमारे दोन अब्ज रुपये आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, वक्फ मालमत्तेवर सध्या किमान ५८,८८९ अतिक्रमणे आहेत, तर १३,००० हून अधिक मालमत्तांवर कायदेशीर कारवाई सुरू आहे. चार लाख ३५ हजारांहून अधिक मालमत्तांची स्थिती अज्ञात आहे.

वक्फ विधेयकातील प्रस्तावित दुरुस्तीमध्ये दोन बिगर मुस्लिम प्रतिनिधी मंडळात असण्याची तरतूद करण्यात आली आहे. यात दोन महिला सदस्य असल्याचेही सांगण्यात आले आहे. मुस्लिमांनी पिढ्यानपिढ्या वापरलेल्या अनेक मालमत्तांकडे औपचारिक दस्तावेज नाहीत, कारण ते मौखिकपणे किंवा कोणत्याही कायदेशीर नोंदीशिवाय दशके किंवा शतकांपूर्वी दान केले गेले होते. अशा प्राचीन सामुदायिक मालमत्तेची मालकी शोधणे खूप कठीण आहे. कारण त्यांचे व्यवस्थापन आणि मालकी व्यवस्था शतकानुशतके मुगल व्यवस्थेपासून ब्रिटिश वसाहती व्यवस्थेकडे राहिली असून आताची व्यवस्था बदलली आहे. 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'ने केंद्र सरकारला वक्फ दुरुस्ती विधेयक मागे घेण्याची मागणी केली आहे. या मंडळाला अशी मागणी करण्याचा अधिकार आहे. त्या विरोधात आंदोलन करण्याचाही अधिकार आहे. त्यांचा तो हक्क कुणीही हिरावून घेता कामा नये; परंतु आंदोलन हे घटनात्मक मार्गाने व्हायला हवे. तसे आंदोलन 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'ने नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे केले. तेव्हा हे विधेयक मंजूर झाल्यास देशव्यापी आंदोलन सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयकावरून संसदेत वाद झाला. त्यानंतर ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले होते. संयुक्त संसदीय समितीत त्यावर चर्चा झाली. तेव्हा टोकाचे वाद झाले. सत्ताधारी आणि विरोधकांनी दुरुस्त्या सुचवल्या. सत्ताधाऱ्यांच्या दुरुस्त्यांची संसदीय समितीने दखल घेतली. विरोधकांच्या सूचना मात्र टोलावल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर कायद्याला किंवा विधेयकाला विरोध असणाऱ्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा जेवढा आणि जसा प्रयत्न करायला हवा होता; तसा तो झालेला नाही. तीन कृषी कायदे, नागरिकत्व सुधारणा कायदा आणि वक्फ दुरुस्ती कायद्याच्या बाबतीत नेमके तसेच झाले. हे विधेयक भेदभावपूर्ण असल्याचाही आरोप होत आहे. कारण त्यात वक्फ बोर्ड आणि कौन्सिलध्ये गैरमुस्लिम सदस्यांचा समावेश करण्यात आल्याचे संबंधितांचे म्हणणे आहे. हिंदू आणि शीखांसाठी देणगीच्या व्यवस्थापनात अशी कोणतीही तरतूद नाही, असे 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'चे म्हणणे आहे. 'एआयएमपीएलबी'चे सरचिटणीस मौलाना फजलुर रहीम मुजादिदी आणि इलियास यांनी म्हटले आहे की पाच कोटी मुस्लिमांनी या विधेयकाविरोधात संयुक्त समितीला ई-मेल पाठवले होते. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, प्रमुख राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय मुस्लिम संघटना आणि प्रमुख व्यक्तींचे व्यापक प्रतिनिधित्व असूनही, सरकारने आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्यास नकार दिला आहे. असे असले, तरी शाहीनबाग आंदोलनाची पुनरावृत्ती करण्याचा इशारा देणे म्हणजे दंगलीला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे.




# रस्ते अपघात कसे रोखणार?

डॉ. भूषणकुमार उपाध्याय

ॲक्सिडेंट कॅपिटल... जगातील सर्वाधिक रस्ते अपघात भारतात होतात, म्हणून हे बिरुद आपल्याला लावले जाते. गेल्या काही वर्षांत देशात एकीकडे रस्ते आणि दळणवळण सुविधा विस्तारत असताना, अपघातांचे प्रमाण आणि त्यात बळी जाणाऱ्यांची संख्याही वाढत चालली आहे. हजारो कुटुंबांच्या आनंदी आयुष्यावर आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर आघात करणाऱ्या अपघातांची ही कारणमीमांसा...

देशभरात महामार्गांचे जाळे विस्तारत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांमधून शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही पक्के रस्ते तयार होत आहेत. रस्ते बांधणी आणि पुलांच्या उभारणीमुळे दळणवळणाला गती येत असल्याचे दिसत आहे. मात्र त्याचवेळी देशातील अपघातांचे प्रमाणही वाढत चालले आहे.

चांगले रस्ते निर्माण करण्यासाठी झटणारे या खात्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीच, खराब रस्त्यांमुळे देशात अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे अलीकडे म्हटले आहे. रस्त्यांच्या प्रकल्पावर काम करणारे स्थापत्य अभियंते आणि त्यांच्या सल्लागारांनी चुकीचे प्रकल्प अहवाल तसेच निकृष्ट डिझाइन तयार केल्यानेच अपघात वाढले आहेत, परिणामी मोठ्या प्रमाणात जीवितहानी होत आहे, असा ठपका त्यांनी ठेवला आहे.

विशेष म्हणजे, भारतातील रस्ते अपघात आणि त्यात जाणाऱ्या बळींची संख्या जगात सर्वाधिक आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २०२१ मध्ये वैश्विक रस्ते सुरक्षेतील सुधारणांसाठी केलेला ठराव महत्त्वाचा आहे. त्यानुसार २०३० पर्यंत रस्ते अपघातांतील बळींचे प्रमाण किमान ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. असेच ध्येय भारतातही केंद्र सरकारने ठेवले आहे.

**देशातील अपघात आणि बळींची वाढती संख्या**

| वर्ष | अपघात | मृत्यू |
|---|---|---|
| २०२० | ३.६६ | १.३२ |
| २०२१ | ४.१२ | १.५४ |
| २०२२ | ४.६१ | १.६८ |
| २०२३ | ४.८० | १.७२ |
| २०२४ | ४.९८ | १.८० |

**(आकडे लाखांमध्ये)**

खराब रस्त्यांप्रमाणेच मद्यपान किंवा ड्रगसेवन करुन वाहन चालवणे, अतिवेग आणि अतिभार असलेल्या वाहतुकीवर नियंत्रण नसणे, वाहतुकीच्या शिस्तीचा अभाव, हिट अँड रनसारख्या घटना, हेल्मेटचा वापर न करणे अशा अनेक गोष्टी वाढत्या अपघातांना कारणीभूत आहेत. नागरिकांनीही वेळेशी मेळ घालण्याच्या प्रयत्नात वाहने वेगाने दामटून स्वतःच्या जीवाशी खेळ करण्याचे प्रकार तातडीने थांबवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि समाजाने अपघातांच्या प्रत्येक कारणावर उपाय शोधण्याचा, त्यानुसार कृती करण्याचा दृढनिश्चय केला, तरच ते कमी होऊ शकतील. अन्यथा, जगातील रस्ते अपघातांची राजधानी हा देशाच्या नावापुढे लागलेला कलंक पुसला जाणार नाही.

**भारताचे अपघातसूत्र...**

- रस्ते अपघातांमध्ये होणारे सुमारे ७० टक्के मृत्यू अतिवेगामुळे.
- २००४ ते २०१३ या दशकात १२.१ लाख लोकांचा मृत्यू, ५०.३ लाख जखमी.
- २०१४ ते २०२३ या दशकात १५.३ लाख लोकांचा मृत्यू, ४५.१ लाख जखमी.
- देशात १० हजार कि. मी. मागे २५० मृत्यू; हे प्रमाण चीनमध्ये ११९, अमेरिकेत ५७, ऑस्ट्रेलियात ११.
- २०२३ मध्ये दर तासाला ५५ अपघात आणि २० मृत्यूंची नोंद.
- गेल्या वर्षी ३० हजार विनाहेल्मेट दुचाकीस्वारांचा अपघातात बळी.
- त्याच वर्षी अपघाती मृत्यू झालेल्यांपैकी ६६ टक्के लोक १८ ते ३४ वयोगटातील.

**महाराष्ट्राचे अपघातचित्र...**

- २०२२ ते २०२४ या तीन वर्षांत एकूण १ लाख ४ हजार ७१० अपघात.
- या तीन वर्षांतील अपघातांमध्ये सुमारे ४५ हजार ९२५ जणांचा मृत्यू.
- २०२२ मध्ये ३३ हजार ३८३ अपघातांमध्ये १५ हजार २२४ जणांचा मृत्यू.
- २०२३ मध्ये ३५ हजार २४३ अपघातांमध्ये १५ हजार ३६६ जणांचा मृत्यू.
- २०२४ मध्ये ३६ हजार ८४ अपघातांमध्ये १५ हजार ३३५ जणांचा मृत्यू.

**१२ वर्षांत दुपटीपेक्षा जास्त वाढली वाहनांची संख्या**

२०२० मध्ये कोरोना काळात लॉकडाऊनमुळे अपघातांमध्ये मोठी घट झाली. मात्र, नंतर हे प्रमाण वाढत गेले. देशात २०१२ ते २०२४ या १२ वर्षांत वाहनांची संख्या दुपटीपेक्षा जास्त वाढली.

२०१२ मध्ये १५.९ कोटी वाहने होती. हा आकडा २०२४ मध्ये ३८.३ कोटींवर गेला. या कालावधीत रस्त्यांची लांबीही सुमारे ११ लाख कि. मी. ने वाढली. २०१२ मध्ये देशातील रस्त्यांची एकूण लांबी ४८.६ लाख कि. मी. होती, ती २०२४ पर्यंत ६६.७१ लाख कि. मी. वर पोहोचली.

**अपघातांमुळे जीडीपीला ५ ते ७ टक्क्यांचा फटका**

नवे रस्ते तयार करणे, रस्त्यांचे रुंदीकरण आणि दुरूस्ती यावर देशात हजारो कोटी रुपये खर्च होतात. त्यातून रस्ते बांधणीशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये प्रचंड आर्थिक उलाढाल होते.

दुसरीकडे, वाहनांची खरेदी आणि त्यासाठीचे कर्ज, इंधन विक्री, वाहनांचा तसेच व्यक्तिगत अपघात विमा, टोल आदी बाबींमुळे रस्ते वाहतूक क्षेत्राचे एक मोठे अर्थकारण उभे राहिले आहे. जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार, दरवर्षी रस्त्यांवरील अपघातांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे जीडीपीच्या ५ ते ७% इतके नुकसान होते. याचा अर्थ, ज्यावर काही लाख कोटींची अर्थव्यवस्था उभी आहे, त्या रस्ते वाहतूक क्षेत्रातील अपघातांमुळे लाखमोलाचे जीव जातातच; शिवाय देशाच्या आर्थिक वाढीलाही मोठा फटका बसत आहे.

**दंडवसुली १०० टक्के होण्याची आवश्यकता...**

बेजबाबदारपणे वाहने चालवण्यामुळे ९० टक्के अपघात होतात. मद्यपान करुन वाहन चालवणे, सीटबेल्ट न लावणे, वाहन चालवताना मोबाइलवर बोलणे, इंडिकेटर किंवा पार्किंग लाइट न लावता रस्त्यावर ट्रक / कंटेनर उभे करणे ही सुद्धा अपघातांची कारणे आहेत.

महाराष्ट्रात या प्रकारे नियमभंग करणाऱ्यांकडून होणारी दंडाची वसुली जेमतेम ४० टक्के आहे. ती १०० टक्के होणे आवश्यक आहे. दंड भरत नाही तोवर संबंधिताला पेट्रोल / डिझेल किंवा गॅस मिळणार नाही, अशी व्यवस्था केली पाहिजे. अपघात घडल्यावर जखमींना गोल्डन अवरमध्ये मदत मिळणे महत्त्वाचे असते. त्यासाठी महामार्गांवरील हॉटेल, ढाबे, पेट्रोल पंपावरील कर्मचारी, लगतच्या गावातील तरुणांच्या सहभागातून आम्ही मृत्युंजयदूत उपक्रम सुरू केला होता. या प्रकारे तरुणांना योग्य प्रशिक्षण दिल्यास अपघातग्रस्तांना लगेच मदत मिळून जीव वाचवता येतील.

---

**(लेखक माजी अतिरिक्त पोलिस महासंचालक - महामार्ग आहेत.)**

● ● ● ●

## बहुतांश अपघात निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे...

रस्त्यांचा निकृष्ट दर्जा हे वाढत्या रस्ते अपघातांचे एक प्रमुख कारण आहे. चुकीची रस्तेबांधणी, अशास्त्रीय स्पीड ब्रेकर, दुरुस्तीची रेंगाळलेली कामे, रस्त्यावरचे खड्डे यांमुळे होणारे प्राणघातक अपघात टाळता येऊ शकतात. त्यासाठी या गोष्टींना जबाबदार रस्ते कंत्राटदार, त्यावर देखरेख ठेवणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल व्हायला हवेत. टोल रोड असूनही रस्त्याचा दर्जा सुमार असेल, तर रस्ता उत्तम होईपर्यंत टोलवसुली थांबवणे, टोल कंत्राटदाराला दंड करणे असे उपाय केले पाहिजेत. वाहनचालकांना परवाना देताना कठोर परीक्षा घेणेही आवश्यक आहे. या प्रक्रियेतील भ्रष्टाचारामुळे अकुशल ड्रायव्हर रस्त्यावर उतरतात आणि अपघात वाढतात. मद्यप्राशन करुन गाडी चालवणे, ओव्हरलोडिंग यामुळेही मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत. त्यासाठी कायद्यांची कठोर आणि जाणवेल अशी अंमलबजावणी झाली पाहिजे.

**विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच, पुणे**

# सोशल मीडियाचा मुलांच्या मेंदूवर वाईट परिणाम



नेटफ्लिक्सवरील 'अहॅडलेसन्स' ही मालिका सध्या चर्चेत आहे. किशोरवयीन मुले सोशल मीडिया आणि इंटरनेटला वास्तविक जग कसे मानत आहेत हे यातून दिसून येते. काही मुले सायबर बुलिंगचे बळी पडत आहेत, त्यांच्या दिसण्याबद्दल असुरक्षित होत आहेत आणि लोकप्रियता न मिळण्याची चिंता करत आहेत. या त्रासांमध्ये, बुलिंगला कंटाळलेला जेमी मिलर नावाचा मुलगा त्याच्या वर्गातील एका मुलीला मारतो. या मालिकेत, सोशल मीडियाचा मुलांवर होणारा परिणाम आणि त्याद्वारे होणारी सायबर बुलिंग यासारख्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली आहे. आपण यापूर्वी अनेक लेखांमध्ये स्क्रीन टाइम आणि सोशल मीडिया वापराच्या परिणामांवर चर्चा केली आहे.

आता हे प्रकरण फक्त सोशल मीडिया किंवा इंटरनेटच्या नैतिक-अनैतिक परिणामापुरते मर्यादित नाही. विज्ञान म्हणते की आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक छोट्या गोष्टीचा आपल्या मेंदूवर परिणाम होतो. जर आपल्याला आपल्या सोशल मीडियावर, स्क्रीनवर किंवा कोणत्याही प्रकारच्या आभासी जगात हिंसाचार दिसला तर आपण हिंसक होण्याची शक्यता वाढते. याचा सर्वात जास्त परिणाम मुलांवर होतो कारण त्यांचे मेंदू या सामग्रीवर प्रक्रिया करण्यास तयार नसतात. याशिवाय, बालपणात त्यांना मिळणाऱ्या वातावरणाचा त्यांच्या वर्तनावर परिणाम होतो.

**मुलांचा मेंदू कसा विकसित होतो?**

आपला मेंदू जन्मापासून प्रौढत्वापर्यंत विकसित होत राहतो. प्रत्येक वयात मेंदू वेगवेगळ्या कौशल्यांचा आणि क्षमतांचा विकास करतो. या काळात, आपल्या आजूबाजूला जे काही घडते ते पाहिले आणि ऐकले जाते. त्याचा मेंदूच्या विकासावर थेट परिणाम होतो.

**मेंदूचा ६०% विकास ०-१ वर्षाच्या दरम्यान होतो**

पाहण्याची, ऐकण्याची, अनुभवण्याची आणि प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होते. मूल त्याच्या पालकांचा आवाज ओळखू लागते. रडणे, हसणे, चिंताग्रस्त होणे, आनंद यासारख्या मूलभूत भावना विकसित होतात. मज्जातंतू कनेक्शन, म्हणजेच न्यूरॉन सर्किट्स, बाह्य जगाशी जोडण्यासाठी तयार होतात.

**मेंदू १-३ वर्षात अंदाजे ८०% विकसित होतो**

शब्द समजून घेण्याची आणि बोलण्याची क्षमता विकसित होते. तो त्याचे अस्तित्व समजू लागतो आणि स्वतःला ओळखू लागतो. पालक आणि आजूबाजूच्या लोकांशी भावनिक जोड निर्माण होते. गोष्टींचा शोध घेण्याचा आणि त्यांची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

तर्क आणि स्मृतीशी संबंधित न्यूरॉन्स ३-६ वर्षांच्या वयात वेगाने तयार होतात. कल्पनाशक्ती विकसित होऊ लागते. भाषेची समज आणि तार्किक विचारसरणी विकसित होऊ लागते. इतरांसोबत आणि सामाजिक संबंधांमध्ये वेळ घालवायला शिकतो. बरोबर आणि चूक आणि चांगले आणि वाईट समजून घेण्याची क्षमता विकसित होऊ लागते.

**६-१२ वर्षांच्या वयात मेंदूचा आकार ९५% वाढतो**

लक्ष केंद्रित करण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते. नियम आणि सामाजिक जबाबदाऱ्या समजून घेऊ लागतो. वाचन, तार्किक क्षमता आणि भाषा कौशल्ये सुधारतात. सहानुभूती विकसित करण्यास आणि इतरांच्या भावना समजून घेण्यास सुरुवात करते.

**१२-१८ वर्षांत, मेंदूचा निर्णय घेणारा भाग, म्हणजेच प्रीफ्रंटल कॉर्टेक्स, विकसित होऊ लागतो**

स्वतःचे विचार आणि भावना समजून घेण्यास सुरुवात होते. स्वावलंबी होण्याची इच्छा वाढते. जोखीम घेण्याची प्रवृत्ती वाढते, परंतु तर्कशुद्ध निर्णय घेण्याची क्षमता पूर्णपणे विकसित होत नाही. सामाजिक दबाव म्हणजेच समवयस्कांचा दबाव आणि भावनिक अस्थिरता वाढू शकते.

**१८-२५ वर्षे - प्रीफ्रंटल कॉर्टेक्स पूर्णपणे विकसित झालेले असते**

दीर्घकालीन नियोजन करण्याची आणि भविष्यातील निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. तुम्हाला नातेसंबंधांना खोलवर समजून घेण्याची आणि टिकवून ठेवण्याची क्षमता मिळते. करिअर आणि जीवनातील ध्येये निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू होते.

**मुलांवर त्याचा कसा विपरीत परिणाम होत आहे?**

मेंदूमध्ये प्रत्येक वयात नवीन क्षमता विकसित होतात. मुलांचे भविष्य त्यांच्या स्वभावावरून ठरवले जाते. म्हणून, या काळात पालक आणि शिक्षकांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. योग्य काळजी, पोषण आणि शिकण्याच्या संधी मिळाल्यास, मुलाची बौद्धिक आणि भावनिक क्षमता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकते. जर गोष्टी सकारात्मक नसतील तर निकाल उलट असू शकतात.

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की सोशल मीडियावर जास्त वेळ घालवल्यामुळे लोकांना पुरेशी झोप मिळत नाही. त्यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. सतत स्क्रीनवर वेळ घालवल्यामुळे स्मरणशक्ती कमकुवत होत चालली आहे आणि लोक चिंता आणि नैराश्यासारख्या समस्यांना बळी पडत आहेत.

**लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होणे**

लक्ष केंद्रित करण्याची क्षमता म्हणजेच विचलित न होता कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता झपाट्याने कमी होत आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठ, इर्विनच्या संशोधनानुसार, गेल्या २० वर्षांत, मानवांचा सरासरी लक्ष वेधण्याचा कालावधी २.५ मिनिटांवरून फक्त ४७ सेकंदांवर आला आहे. याचे मुख्य कारण सोशल मीडियाचे व्यसन असल्याचे मानले जाते.

**स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता कमकुवत होत चालली**

सोशल मीडियाचा अतिरेकी वापर स्मरणशक्ती, भाषा शिकण्याची क्षमता आणि मेंदूच्या विकासावर नकारात्मक परिणाम करतो. यामुळे दीर्घकाळ लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते, विशेषतः मुलांमध्ये. त्यांच्यासाठी कोणतेही सर्जनशील कार्य पूर्ण करणे कठीण होते, कारण या प्रक्रियेसाठी दीर्घकाळ लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते.

**भावनिक आरोग्यावर परिणाम होत आहे**

सोशल मीडियाचा अतिरेकी वापर मुलांच्या आणि किशोरवयीन मुलांच्या भावनिक आरोग्याला हानी पोहोचवत आहे. ऑनलाइन तुलना, लाईक्स आणि कमेंट्सची चिंता आणि सायबर बुलिंग यासारख्या समस्या त्यांचा आत्मविश्वास कमकुवत करत आहेत. यामुळे त्यांच्यात एकटेपणा, चिडचिडेपणा आणि चिंता वाढत आहे, जी मानसिक आणि भावनिक विकासासाठी हानिकारक असू शकते.

**अश्लील सामग्री पाहून मानसिकता बिघडते**

सोशल मीडिया आणि इंटरनेटवर सतत अश्लील सामग्री पाहणाऱ्या मुलांचा त्यांच्या वर्तनावर आणि मानसिक विकासावर नकारात्मक परिणाम होतो. ते त्यांच्या विरुद्ध लिंगाला फक्त लैंगिक वस्तू म्हणून पाहू लागतात. हे धोकादायक आहे.

**हिंसाचार पाहिल्याने आक्रमकता वाढते**

अधिक हिंसक सामग्री पाहिल्याने आक्रमकता वाढते आणि सहानुभूती कमी होते. सतत हिंसक सामग्रीचे सेवन केल्याने मुलांची विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता देखील प्रभावित होत आहे; ते हिंसाचाराला सर्व गोष्टींवर उपाय मानतात.

■ ■ ■

# 'फायरबॉल'.. वेध पृथ्वी अन् खगोलाच्या अंतरंगाचा

समीर गायकवाड



काही वर्षांपूर्वी अप्रूप वाटणारे ओटीटी प्लॅटफॉर्म आता सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. पण, तिथे आठवड्याला शेकडो सिनेमे, वेब सिरीज येत असतील तर पाहणारा भांबावून अन् भंडावूनही जातो. मग तो काही वेगळे शोधू लागतो. वेगळेपणाची ही भूक भागवण्याचे पर्यायही ओटीटीवरच उपलब्ध आहेत.

एखादा महाकाय लघुग्रह पृथ्वीवर आदळेल आणि त्यामुळे डायनासोरप्रमाणे मानवजातही अकस्मात नष्ट होईल, ज्यायोगे आपल्या सर्व चिंताही लुप्त होतील, अशी भीतीयुक्त आशा ज्यांना वाटत असेल, त्यांनी वर्नर हर्झोगचा फायरबॉल : व्हिजिटर्स फ्रॉम डार्कर वर्ल्डस् हा माहितीपट नक्कीच पाहावा.

केंब्रिज विद्यापीठाचे ज्वालामुखीशास्त्राचे प्राध्यापक क्लाइव्ह ओपेनहायमर यांच्यासोबत वर्नर यांनी ही डॉक्युमेंट्री सह-दिग्दर्शित केली आहे. या माहितीपटात पृथ्वीच्या विलोपनाच्या, सर्वनाशाच्या शक्यतेसह लघुग्रह, उल्कापिंड आणि उल्कापिंडांच्या संरचनात्मक जैवभौतिक बाबींचे विश्लेषण करून त्यावर भाष्य केले आहे.

ओपेनहायमर यांनी इन टू द इन्फर्नो या ज्वालामुखी माहितीपटासाठी वर्नर यांच्यासोबत काम केले होते. दक्षिण कोरियातील एका प्रयोगशाळेला भेट दिल्यावर त्यांना या माहितीपटाची कल्पना सुचली. इथे उल्कापिंडांवर आधारित प्रोजेक्टवर काम सुरू होते. मग त्यांनी आपली कल्पना हर्झोगच्या कानावर घातली.

माहितीपटातील घटनाक्रम पाहताना, मक्का येथील काबा मशिदीत बसवलेल्या काळ्या दगडाची आपसूक आठवण होते. खरे तर, हा माहितीपट म्हणजे भूविज्ञानाचाच एक विषय आहे. तो भूगर्भाच्या, पृथ्वीच्या विविध घनस्तरांच्या अनोख्या संरचनात्मक घटकांचे आणि त्यांच्याशी संबंधित घटनांचे निसर्ग व विज्ञान एकत्रितरित्या मांडतो.

या माहितीपटात जगभरातील खगोलीय घटना, धूमकेतू, उल्का, पृथ्वीवर पडणारे दगड यांच्याबद्दलचे कुतूहल आणि वास्तवातले शास्त्रीय प्रकटन यांचे देखणे चित्रण आहे, ते पाहताना मती गुंग होते. वर्नर आणि ओपेनहायमर यांनी अंटार्क्टिकातील एका सक्रिय ज्वालामुखीच्या शिखरावर आधी काम केलं. मग या माहितीपटासाठी जगभरातील सहाही खंडात डझनभर निबिड ठिकाणी प्रवास केला.

यामध्ये; टोरेस सामुद्रधुनी, सहारा वाळवंट, भूमध्य समुद्राचा परिसर, आल्प्स पर्वतरांगा, पॅसिफिकचा समुद्रतळ, पोपचे उन्हाळी निवासस्थान आणि रिटर्न टू अंटार्क्टिका यांचा समावेश होता. या माहितीपटात रुक्षता नाही, कारण याची शैली नर्मविनोदी आणि उपहासगर्भ आहे. बिनकामाच्या माहितीचे भारंभर रकाने नाहीत.

सखोल अभ्यासातून समोर येणारी माहितीही कमीत कमी किचकट आहे. तिच्या सुलभीकरणावर मेहनत घेतल्याचे जाणवते. या माहितीपटाचा टोन केवळ नॅरेटिव्ह नाही, तर त्यात काही संशोधनात्मक बाबींचा रंजक समावेश असल्याने सायन्समध्ये रुची नसणारी मंडळीही ही पाहताना दंग होतात.

कित्येकांना शालेय, महाविद्यालयीन जीवनापासूनच शास्त्रीय सैद्धांतिक विषयात अभिरुची नसते. त्याचे एक कारण म्हणजे, या विषयांचे सादरीकरण लोकप्रिय शैलीचे नसते, तर ते काहीसे रुक्ष, किचकट असते. शिवाय, याचे प्रयोजन माहिती देण्याचे वा संशोधनात्मक असते. परिणामी ज्यांना नवी शास्त्रीय माहिती घेण्यात स्वारस्य नसते, ती मंडळी अधिकच दूर जातात. मात्र, ही डॉक्युमेंट्री त्याला अपवाद ठरेल.

उल्कापिंडांनी निर्माण केलेल्या विवरांचे व्हीएफएक्स विलक्षण बोलके आहेत. खऱ्या विवरांची आणि कृत्रिमरित्या निर्मिलेल्या विवरांची बेमालूम सरमिसळ केली आहे. या विवरांचा वैज्ञानिक प्रभाव दाखवताना, काल्पनिकतेची झालर लागू न देताही हा भाग रम्य झाला आहे. हा माहितीपट पाहताना, पृथ्वीच्या भूस्तराविषयी आपली माहिती किती तकलादू आणि कमालीची त्रोटक आहे, हे जाणवते.

सायन्स आवडत नाही, असे खूप लोक असतात आणि सायन्स आवडते, पण भूगर्भशास्त्र कंटाळवाणे वाटते, अशांची संख्याही मोठी आहे. या सर्व न-प्रेक्षकांनीही हा माहितीपट अवश्य पाहावा. त्यांची टेस्ट बदलू शकते!

टोरांटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात १० सप्टेंबर २०२० ला या माहितीपटाचा जागतिक प्रीमियर झाला आणि जगभरात त्याचा गाजावाजा झाला. त्यानंतर दोनच महिन्यांत तो ॲपल टीव्ही+ वर प्रदर्शित झाला. सध्या याच ओटीटी प्लॅटफॉर्मवर तो पाहता येईल. काही ओटीटी बंडल्समध्ये आता ॲपलचे सबस्क्रिप्शन मोफत असल्याने याचा स्वतंत्र खर्च येत नाही. ■ ■

# बलुचिस्तानचा प्रश्न

डॉ. सुखदेव उंदरे

बलुचिस्तानातील सिब्बी जिल्ह्यात ११ मार्चला क्वेट्टाहून पेशावरकडे जाणाऱ्या जाफर एक्स्प्रेसवर हल्ला चढवून ही ट्रेनच हायजॅक करण्यात आली. बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) हा हल्ला केला. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या फतेह स्क्वाडचीही साथ त्यांना मिळाली. या हल्ल्यातून पाकिस्तान सरकार आणि लष्कर सावरण्याआधीच बीएलएने नुकताच, १६ मार्चला पाकिस्तानी लष्करी बसच्या ताफ्यावर आत्मघाती हल्ला केला. त्यात ९० सैनिक मारले गेल्याचा दावा बीएलएने केला. पाकिस्तानातील या घटनांनी जगाच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यामुळे बलुचिस्तान आणि तिथल्या संघर्षाकडे इतिहास, वर्तमान आणि भविष्याच्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल.

**पाकमध्ये सामील व्हायचे नव्हते :** बलुचिस्तान प्रांत हा मुख्यत्वे चार संस्थानात विभागलेला होता. कलात, खरहान, लॉस बेला आणि मकरा. यापैकी कलात सर्वांत शक्तिशाली संस्थान होते. कलातच्या खानाला सार्वभौम राहायचे होते. भारताच्या फाळणीनंतर कलात म्हणजेच बलुचिस्तान सुमारे २२७ दिवस स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य राहिले. या प्रांताला पाकिस्तानात सामील व्हायचे नव्हते आणि मोहम्मद अली जिनाही सुरूवातीला या भूमिकेशी सहमत होते.

**भू-राजकीय, सामरिक महत्त्व :** पाकिस्तानातील पंजाब, खैबर पख्तुनख्वाह आणि सिंध या अन्य तीन प्रांतांपेक्षा बलुचिस्तान क्षेत्रफळाने मोठा आहे. पाकिस्तानचा जवळपास ४४ टक्के भूभाग या प्रांताने व्यापला असून, तिथली लोकसंख्या सुमारे दीड कोटी आहे. पाकिस्तानी नौसेनेचे तीन तळ बलुचिस्तानात आहेत. या प्रांतातील चगाईमध्ये अणुचाचणी करूनच पाकिस्तान आण्विक शक्ती बनला. पाकिस्तानची २० टक्के नैसर्गिक संसाधने याच प्रांतात आहेत.

**चळवळीचे पुनरुत्थान :** बलुच लोकांचे सार्वभौम हित आणि अधिकारांसाठी लढत असल्याचा ह्यबीएलएह्नचा दावा आहे. २००० च्या दशकाच्या प्रारंभी या संघटनेचा उदय झाल्याचे मानले जाते. पण, काही विश्लेषक या संघटनेला पूर्वीच्या बलुच बंडखोरीचे, विशेषतः १९७३ ते १९७७ च्या स्वतंत्र बलुचिस्तान चळवळीचे पुनरुत्थान मानतात.

पाकिस्तानच्या निर्मितीपासून बलुच प्रांत अविकसित राहिला आहे. पाकिस्तान सरकारकडून होणाऱ्या उपेक्षेमुळे तिथे स्वातंत्र्याची मागणी जोर धरू लागली. बीएलएमुळे तिला पाठबळ मिळाले. या भागातील चीनच्या प्रवेशानंतर तिथली परिस्थिती अधिकच चिघळत गेली. पाकिस्तानने बलुचिस्तानातील ग्वादर बंदर चीनला भाडेपट्ट्यावर दिले. स्थानिक बलुच लोकांमधील असंतोष वाढण्यामागचे हेही एक कारण आहे.

**भारताची भूमिका काय? :** बलुच बंडखोरांना भारताचा पाठिंबा असल्याचे आरोप पाकिस्तानकडून सातत्याने केले जातात. भारताने नेहमीच हे आरोप फेटाळले आहेत. तथापि, बलुच लोकांच्या आत्मनिर्णयाच्या अधिकाराचे महत्त्व समोर ठेऊन भारताने अनेकदा संयुक्त राष्ट्रांसह अन्य आंतरराष्ट्रीय मंचांवर बलुचिस्तानचा मुद्दा उपस्थित केला आहे.

बलुचिस्तानच्या मुद्द्यावर भारताची भूमिका पाकिस्तानसोबतच्या संबंधात राखल्या जाणाऱ्या नाजूक संतुलनामुळे जास्त गुंतागुंतीची बनली आहे. तूर्तास बलुचिस्तानातील लोकांच्या आशा-आकांक्षांचा आदर करणाऱ्या अर्थपूर्ण वाटाघाटींमध्ये या समस्येच्या सोडवणुकीचा मार्ग सापडू शकतो. या मुद्द्यावर आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत भारताचा राजनयिक पाठिंबा आणि हातभार भविष्यात निर्णायक ठरेल. ■ ■

# स्वच्छ, सुरक्षित कुंभमेळा यशस्वीतेसाठी सर्वांचा सहभाग आवश्यक : महाजन

**नाशिक ।** मागील कुंभमेळ्याच्या धर्तीवर 2027 मध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा स्वच्छ व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सर्वांचा सहभाग आवश्यक असून, ही एक सामूहिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी सर्वांच्या सहकार्यातून यशस्वीपणे पार पाडू, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. शुक्रवारी (दि. २९) जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महापालिका आयुक्त मनीषा खत्री, उपजिल्हाधिकारी (कुंभमेळा) रवींद्र भारदे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, महंत डॉ. भक्तीचरणदास महाराज, महंत रामनारायणदास महाराज, कपिलधारा कावनई, महंत कृष्णचरदास महाराज, महंत राजारामदास महाराज, महंत भगवानदास महाराज, महंत नरसिंगाचार्य महाराज, महंत बालकदास महाराज, पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे महंत उपस्थित होते. महाजन पुढे म्हणाले की, आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची व सहकार्याची आवश्यकता आहे. प्रयागराज येथे झालेला कुंभमेळ्यातील भाविकांची संख्या लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर येथेही मागील कुंभमेळाच्या तुलनेत 3 ते 4 पट अधिक गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच त्यावेळी पावसाळ्याचा कालावाधी असल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षितेचे अधिक काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. कुंभ पर्वणी काळात महंत व भाविकांच्या स्नानासाठी नदीपात्रातील पाणी स्वच्छ व वाहते ठेवण्याच्या दृष्टीने पर्यायी पाणीसाठा उपलब्ध करण्यासाठी नियोजन सुरू असल्याचे. महाजन यांनी सांगितले.



### संत-महंतांनी केल्या विविध सूचना-अपेक्षा





सिंहस्थ कुंभमेळासाठी योग्य नियोजन व सुविधांसाठी आवश्यक जमिनी कायमस्वरूपी संपादित केल्या जातील. साधू-महंत यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यासाठी निधीची कमतरता भासणार नाही असेही महाजन यांनी सांगितले. यावेळी महंत डॉ.भक्तीचरणदास महाराज, महंत रामकिशोरदास महाराज, रामसनेहीदास महाराज, राघवदास महाराज, सतीश शुक्ल यांच्यासह महंतांनी सिंहस्थ कुंभमेळा दृष्टीने विविध सूचना मांडल्या. तत्पूर्वी जिल्हाधिकारी शर्मा यांनी बैठकीसाठी आलेल्या सर्व महंतांचे स्वागतकेले.

---

## महत्त्वाचे

### नियोजनातील त्रुटीमुळे सिडकोत पाणी प्रश्न जटील

**सिडको ।** सिडको विविध भागांमध्ये पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काही भागात गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत असून, टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महापालिकेच्या नियोजनातील त्रुटी ही मुख्य कारणे असल्याचे स्पष्ट झाले आहे. काही ठिकाणी बोरवेलचे दूषित पाणी प्यावे लागत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. त्यांच्यासाठी सामान्य कुटुंबांना दरमहा दोन ते तीन हजार रुपये खर्च करावे लागत असल्याने आर्थिक ओझे वाढले आहे. पाणी- टंचाईमुळे काही भागात नागरिक आणि प्रशासन यांच्यात वादाचे प्रसंग हे घडू लागले आहेत. महिलांनी महापालिकेला इशारा दिला असून, आठवडाभरात पुरेसा पाणीपुरवठा न झाल्यास हंडा मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने पाणीबचत मोहीम सुरू केली असली तरी नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी त्वरित उपाययोजना होणे गरजेचे आहे. कमी दामाने पाणी येणे तसेच पाणीपुरवठा न होणे ही बाब नित्याची झाली आहे. त्यामुळे बरेचसे महिला हातपंपावर विहिरीवर तसेच टँकरद्वारे पाणी भरत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे. यापुढे नागरिकांनी व महिलांनी निवेदन दिली मोर्चा काढले; परंतु त्या संदर्भात प्रशासन कुठलाही प्रकारचा फरक पडले दिसत नाही. अनेक वेळा दुरुस्तीसाठी दिवसभर पाणीपुरवठा खंडित करण्यात आला तरी देखील पाणीपुरवठा मात्र नंतर सुरळीत झाल्याचे चित्र बघायला मिळाले नाही. लोकप्रतिनिधी मात्र यावर छुपी साधत आहे तर प्रशासनाने पाठ फिरवल्याचे दिसत आहे.

### त्र्यंबक रोडवरील वाहतूक उद्या बंद

**नाशिक ।** सातपूर येथे गुढीपाडव्यानिमित्त बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे. यामुळे रविवारी (तारीख ३०) दुपारी चार ते रात्री दहापर्यंत त्र्यंबक रोडवरील सकाळ सर्कल ते महिंद्रा सर्कल मार्गावरील वाहतूक बंद राहील, असे शहर वाहतूक शाखेने कळविले आहे. उत्सवा दरम्यान गर्दीमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे मार्ग बंद करण्यात आला आहे. पर्यायी मार्ग म्हणून सकाळ सर्कल स्वराज्य चौक, नाशिक ऑक्सिजन कंपनी, जलतरण तलाव समोरून पंढरीनाथ गांगुर्डे चौक मार्गाने वळविण्यात आली आहे.

### मनमानी कामामुळे पाथर्डीत समस्या गंभीर

**इंदिरानगर ।** पाथर्डी फाटा भागातून अर्ध्या नाशिकला पाणी वितरण होत असताना शेजारीच असलेल्या वासननगर, प्रशांत नगर, आनंद नगर, जीएसटी भवन परिसर, दामोदर नगर आदी भागातील नागरिकांना नेहमीच कमी-अधिक फरकाने पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते. एका भागातून नागरिकांनी उठाव केला की पुढच्या आठ दिवस तेथे पाणीपुरवठा सुरळीत होतो. त्याच वेळेस इतर ठिकाणी समस्या उभी राहते. पाणी सोडणारे त्यांच्या मनाप्रमाणे काम करत असल्याने समप्रमाणात पाणी मिळत नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. हॉटेल एक्सप्रेस इनच्या मागच्या बाजूला असणाऱ्या तसेच पाथर्डी-गौळणी रस्त्याला मोठ्या संख्येने वस्ती वाढली आहे. येथे पाण्याच्या पाईपलाईनच नाहीत मागील आठवड्यात या भागातील महिलांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. दररोज विकतचे पाणी येथील नागरिकांना घ्यावी लागते. इंदिरानगर, राजीव नगर, श्रद्धा विहार, वडाळ गाव, अशोका मार्ग, पांडव नगरी या भागात देखील नेहमीच कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारी नागरिक करतात. गजानन महाराज मार्ग, मोदकेश्वर मंदिर परब नगर आणि बजरंग सोसायटी या भागात देखील कमी दाबाने पाणीपुरवठ्याची तक्रार आहे. मोठ्या प्रमाणात सदनिका असलेल्या सोसायटी त्यांना तर हमखास विकतचे पाणी घ्यावे लागते.

### रमजान ईद मुळे वाहतुकीत बदल

**नाशिक ।** रमजान ईद निमित्त सोमवारी (दि. ३१) इदगाह मैदानावर मुस्लिम बांधव नमाज पठणासाठी एकत्र येणार आहे. त्यामुळे होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक शाखेकडून वाहतुकीत बदल करण्यात आले आहे. तसेच 30 मार्चला दुपारी तीन पासून ते रात्री बारापर्यंत दूध बाजार परिसरातील अब्दुल हमीद चौक,फाळके रोड टी पॉइंट, हॉटेल हाजी दरबार, चौक मंडई, महात्मा फुले पोलीस चौकी मार्ग वाहतुकीस बंद राहतील. यासाठी पर्यायी मार्ग म्हणून बादशाही कॉर्नरकडून दूध बाजाराकडे जाणारी वाहतूक जुने भद्रकाली, पिंपळ चौक मार्गे त्रंबक पोलीस चौकी, गाडगे महाराज पुतळ्या मार्गे जाईल. तसेच सारडा सर्कल, गंजमाळ, खडकाळी सिग्नल, महात्मा फुले चौक, द्वारका सर्कल ते टाळकेश्वर पूल मार्गे सुरू ठेवण्यात आली आहे. 31 मार्चला सकाळी सात ते दुपारी एक पर्यंत मुंबई नाका सिग्नल ते गडकरी चौक सिग्नल सीबीएस ते त्रंबक नाका सिग्नल भवानी मायको सर्कल ते तरण तलाव सिग्नल या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. यासाठी पर्यायी वाहतूक मुंबई नाका गडकरी चौकाकडून येणारी संधी हॉटेल कडून गुरूद्वारा मार्गे सीबीएस कडून मोडक सिग्नलकडे जाणारी वाहतूक टिळकवाडी सिग्नल मार्गे, कान्हेरेवाडीकडून मायको सर्कलकडून मोडक सिग्नलकडे जाणारी वाहतूक तरण तलाव सिग्नल डावीकडून टिळकवाडी मार्गे धामणकर कॉर्नरवर उजवीकडून वळवली आहे.

---

# पथनाट्य हे सामाजिक बदलाचे प्रभावी माध्यम : डॉ. देशमुख

## मविप्र समाजकार्य महाविद्यालयात राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धा उत्साहात

**नाशिक ।** पथनाट्य कलाकार हा सामाजिक भान असणारा व्यक्ती असतो. अभिव्यक्ति स्वातंत्र्याबाबत समाजाला दिशा देण्याचे काम पथनाट्याद्वारे करता येते. पथनाट्य हे समाज जागृतीचे आणि सामाजिक बदलाचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन मविप्र शिक्षणाधिकारी तथा समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले.



मविप्र समाजाचे समाजकार्य महाविद्यालय आणि आयडियाझम सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हुंकार करंडक राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धा २०२५ चे आयोजन समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये करण्यात आले होते. त्याप्रसंगी डॉ. देशमुख बोलत होते. आयडियाझम संस्थेने आयोजित केलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत १२ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उदघाटन आयडियाझम संस्था अध्यक्ष नारायण गभाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक स्वामीराज भिसे, प्रतिक विसपुते, समाजकार्य महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळ समन्वयक डॉ. सुनीता जगताप, संकेत बिडगर यांनी केले. सामाजिक जनजागृती करणे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे तसेच समाजभान जपणारी तरुणाई घडविणे, हे मुख्य उद्देश समोर ठेवून स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सादरीकरणासाठी कुठलाही सामाजिक विषय घेण्याचे आवाहन संस्थेने केले होते. त्यामध्ये 'मोबाइल एक व्यसन', 'हुंडा, स्त्री जन्मा तुझी कहाणी', 'पन्नास टास्क- खेळ खल्लास',' मराठी भाषा', 'पराभव महापुरुषांच्या विचारांचा', 'पलायन', 'सत्य शोध जनते' असे विविध विषय घेवून समाजप्रबोधन करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक स्वामीराज भिसे तसेच लेखक, दिग्दर्शक, सिनेअभिनेते प्रतिक विसपुते यांनी केले. बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी मविप्र समाज शिक्षणाधिकारी तथा समाजकार्य महाविद्यालय नाशिकचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी स्पर्धकांना पथनाट्य कला संवर्धनासाठी आवाहन करत प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. याप्रसंगी आयडियाझम संस्था अध्यक्ष नारायण गभाले, स्वामीराज भिसे, प्रतिक विसपुते, डॉ. सुनीता जगताप, सतीश वराडे, संकेत बिडगर उपस्थित होते. स्पर्धेत सहभागी सर्व गटातील उत्कृष्ट कलाकारांचा तसेच उपस्थित संघनायक प्राध्यापकांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. वेल्स ऑन व्हील्स, गौरी सामाजिक कल्याणकारी संस्था, नाशिक, सारथी फाउंडेशन संगमनेर, वूइ-४ डान्स स्टुडीओ, नाशिक, समाजकार्य महाविद्यालयाचे स्वयंसेवक विद्यार्थी, कर्मचारी वाळूराम पवार, वीरबहादूर सिंघ यांनी विशेष परशराम घेतले. साक्षी दिंडोरकर, कल्याणी टोंगारे यांनी सूत्रसंचालन केले.

### मविप्र विधी, सिडको महाविद्यालय विजेते

या स्पर्धेत लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय नाशिक हा संघ प्रथम, मविप्र समाज संचलित विधी महाविद्यालय नाशिक यांचा संघ द्वितीय आणि मविप्र समाजाचे केएसकेडब्लू सिडको महाविद्यालयास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच उत्कृष्ट कलाकाराचे पारितोषिक एनबीटी लॉ चा विद्यार्थी नितीश कुमार तर उत्कृष्ट पथनाट्य लेखनाचे पारितोषिक अगस्ती महाविद्यालय, अकोलेच्या प्रा. रंजना कदम यांना मिळाले.

---

# रानोमाळी खुणावताहेत केशरी रंगाने फुललेले पळस

**एकलहरे ।** भौगोलिक स्थिती पाहता डोंगरदऱ्यांनी नटलेला, पावसाळ्यात सुखावणारा हा परिसर उन्हाळ्यातही तेवढाच सुखद होतो, तो रानोमाळी पळस फुलण्याने. वसंत ऋतूचे आगमन होण्यापूर्वी एकलहरा पीएमडब्ल्यू या डोंगरमाथ्याचा परिसर केशरी गडद रंगाच्या फुलांनी बहरलेली पळसाची झाडे गुलमोहराचे झाडे लक्ष वेधून घेतात.





बहुगुणी वृक्ष असलेल्या पळसाच्या फुलांना वाळवून ते होळीच्या वेळी भिजवून रंग तयार केला जातो, आजही डोंगरदऱ्यातील वाडी-वस्त्यांवर हा रंग वापरला जातो. हाच पळस पावसाळ्यात फुलला की पाने देतो, त्या पानांच्या पत्रावळ्या पूर्वी बनविल्या जायच्या. आज त्याची जागा प्लॅस्टिक कागदी पत्रावळ्यांनी घेतली आहे. वसंत ऋतू लागताच एकलहरा पी एम डब्ल्यू डोंगरळ भागात अभयारण्यातील जंगलव्याप्त भागात ठिकठिकाणी पळसाची फुले नैसर्गिक सौंदर्याने रंगाची मनसोक्तपणे उधळताना करतात. नाशिकरोड या मार्गालगत एकलहरा येथे शेतबांधावर डोंगर भागात असलेली ही पळसाची फुले अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे. **(छाया : तुकाराम कदम)**

---

# त्र्यंबकेश्वर तालुक्यातील शेकडो घरकुल लाभार्थी अनुदानापासून वंचितच

## गटविकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**त्र्यंबकेश्वर ।** तालुक्यातील सन २०२४ / २५ मध्ये प्रधान मंत्री अवास योजनेअंतर्गत, जन् मन आवास योजनेअंतर्गत, शबरी आवास योजनेअंतर्गत घकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर दुसरा हप्ता अजूनही घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झालेला नाही. अनुदान न मिळाल्याने घरकुल अर्धवट राहील, अशी भीती लाभार्थ्यांत निर्माण झाली आहे.



पावसाळ्याचे दिवस जवळ येत असल्याने घरकुलाचा दुसरा हप्ता अजूनही खात्यावर जमा होत नसल्याने पावसात उघड्यावर राहण्याची वेळ येणार असल्याचे लाभार्थी सांगत आपला संताप व्यक्त करत आहेत. तात्काळ पहिला व दुसरा हप्ता वितरीत करावा, अशी मागणी श्रमजीवी संघटनेचे भगवान डोखे यांनी केली आहे. घरकुल बांधण्यासाठी गावठानात जागा शिलक नाही. अनेक लोक हे वनविभागाच्या जागेत रहात आहेत. तरी त्यांना शासन निर्णयाप्रमाणे गावठाण जागेत जागा उपलब्ध करून देण्यास ग्रामपंचायतीकडून पाठपुरावा होत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना घरे बांधण्यास अडचण निर्माण होत आहे. तरी प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर लवकर अनुदान रक्कम अदा करावी. असे निवेदन या वेळी संघटनेच्या वतीने त्र्यंबकेश्वरच्या गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले.

---

# सिडको अग्निशामक दलाच्या नवीन इमारतीचे उद्या कलश पूजन

**सिडको ।** गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सिडको अग्निशामक दलाच्या नवीन इमारतीचे कलश पूजनाचा कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा मुख्य अग्निशामक अधिकारी यांच्या हस्ते पार पडणार आहे.



सिडको परिसरात नवीन अग्निशमन केंद्राच्या इमारतीची उभारणी करण्यात आली असून, ही इमारत आधुनिक सुविधा आणि अत्याधुनिक यंत्रणांनी सुसज्ज आहे. या नव्या केंद्रामुळे आपत्कालीन परिस्थितींना अधिक जलद प्रतिसाद देता येईल.शहरातील नागरिकांना तत्पर सेवा मिळेल. कार्यक्रमासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नवीन इमारतीच्या उद्घाटनाने अग्निशमन विभागाची क्षमता वाढणार असून, भविष्यात आणखी जलद आणि प्रभावी मदतकार्य करता येणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला स्थानिक नागरिक आणि मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. गुढीपाडव्याच्या मंगलदिनी होणाऱ्या या पूजन सोहळ्यामुळे नवीन इमारतीला शुभारंभाचा सकारात्मक ऊर्जा मिळणार असून, येणाऱ्या काळात हे केंद्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी मोलाचे ठरणार आहे.

---

# नाशिक जिल्हा तालीम संघाच्या कार्याध्यक्षपदी दिनकर पाटील बिनविरोध

**पिंपळगाव बसवंत ।** नासिक जिल्ह्यातील नामवंत कुस्तीगीर व जवळके वणी, ता. दिंडोरी येथील रहिवासी दिनकरराव गंगाधर पाटील यांची नासिक जिल्हा तालीम संघाच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

गत अनेक वर्षापासून नासिक जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्रात बहुमोल योगदान देत असल्याबद्दल दिनकरराव पाटील यांची कार्याध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली असून या संदर्भात जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष गोरखनाथ बलकवडे यांनी दिनकर पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. तालीम संघाच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल पाटील यांचा पिंपळगाव बसवंत येथील जनपथ ग्रुपच्यावतीने पिंपळगाव बाजार समितीचे संचालक दिलीपराव मोरे, जिल्हा संघाचे संचालक सोमनाथ मोरे, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते साहेबराव मोरे, निफाड एज्युकेशन संस्थेचे संचालक उद्धवराव निरगुडे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रामराव मोरे सुधाकर मेंगाणे, डॉ दिगंबर गायकवाड, समाधान साठे, सोमनाथ मोरे, दौलतराव दौंड, अशोकराव बोरस्ते, रामनाथ संधान, संजय मोरे, अभिजीत जाधव आदींसह जनपद ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. पाटील यांनी नासिक जिल्ह्यात व दिंडोरी तालुक्यात त्यांनी अनेक नामवंत पहिलवान घडविले असून, अनेक वर्षापासून ते जिल्हा तालीम संघात सक्रिय आहेत. त्यांच्या निवडीबद्दल मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



> दिनकरराव पाटील यांना बालपणापासून कुस्तीची आवड होती. त्यांनी कोल्हापूर येथे अनेक वर्ष कुस्तीचे प्रशिक्षण घेतले आणि नाशिक जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्राला वाहून घेतले. नासिक जिल्ह्यात त्यांनी अनेक कुस्तीगीर तयार केले आहे. त्यांच्या योगदानाची दखल वेळोवेळी जिल्हा तालीम संघाने घेऊन त्यांच्यावर नेहमीच वेगवेगळी जबाबदारी सोपविली आणि दिनकरराव पाटील यांनीही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तालीम संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून ते निश्चितच चांगले काम करतील यात शंका नाही.
>
> **- दिलीप मोरे, संचालक, पिंपळगाव बाजार समिती**

# मोदी सरकार भारताच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करेल, स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक घुसखोरांसाठी घातक ठरेल: अमित शहा

**मुंबई, २९ मार्च :** केंद्रीय गृहमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी लोकसभेत स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर उत्तर देताना स्पष्ट संदेश दिला की हे विधेयक घुसखोरांसाठी घातक ठरणार आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत किंवा देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी देशात येणाऱ्या प्रत्येक परदेशी नागरिकाचे स्वागतच आहे. मात्र, देशाच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांना मोदी सरकारकडून कठोर प्रत्युत्तर दिले जाईल. भारत काही धर्मशाळा नाही जिथे कुणीही घुसखोर येऊन स्थायिक होऊ शकतो. केवळ देशानेच नव्हे, तर संपूर्ण जगाने पाहिले आहे की गेल्या १० वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत एक सुरक्षित, महासत्ता आणि विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे.

भारतीय राजकारणाला नव्याने परिभाषित करणारे आणि देशाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणारे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक आणले आहे. हे विधेयक देशाच्या सुरक्षिततेला आणि अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच, शिक्षणव्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी, संशोधन आणि विकासासाठी मजबूत पाया घालण्यासाठी आणि २०४७ पर्यंत भारताला प्रत्येक क्षेत्रात जागतिक नेता बनवण्यासाठी हे विधेयक मदत करेल.

वसुधैव कुटुंबकम् चा मंत्र जगाला देणाऱ्या भारताने निर्वासितांसाठी ऐतिहासिक योगदान दिले आहे. जगातील सर्वात लहान अल्पसंख्याक जर कुठे सर्वात मोठ्या सन्मानाने राहत असतील तर तो भारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, शेजारील देशांमधील सहा अत्याचारग्रस्त समुदायांना नागरिकत्व दुरुस्ती कायद्यांतर्गत भारतात आश्रय देण्यात आला आहे.



भारतीय राजकारणातील चाणक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमित शहा यांनी पश्चिम बंगाल सरकारवर टीका करताना सांगितले की, बांगलादेशशी असलेल्या २,२१६ किलोमीटर लांब सीमेमध्ये १,६५३ किलोमीटर भागात कुंपण उभारण्यात आले आहे. मात्र, अजूनही ५६३ किलोमीटर सीमा खुली आहे, ज्यातील ११२ किलोमीटर क्षेत्र हे नद्या, कालवे आणि डोंगराळ भूभागाचे असल्याने तेथे कुंपण घालणे कठीण आहे. उर्वरित ४५० किलोमीटर भागात कुंपण उभारता येऊ शकते, पण बंगाल सरकार जमीन उपलब्ध करून देत नाही, म्हणून हे काम रखडले आहे.

भाजपला तळागाळातून शिखरावर नेणारे अमित शहा यांनी भाकीत केले की २०२६ च्या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार येईल आणि त्यानंतर घुसखोरांना प्रवेश करता येणार नाही. नवीन भारत घडवण्यावर लक्ष केंद्रित करत अमित शहा यांनी स्पष्ट केले की स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक हे साधे, ठोस आणि वेळेवर निर्णय घेणारे कायदे असलेल्या व्यवस्थेसह भारताला २०२७ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करण्यात मैलाचा दगड ठरेल.

# शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालयाचा महिलांच्या आरोग्यासाठी पुढाकार

**नागपूर, २९ मार्च :** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीयू) सोबत संलग्न असलेले नागपूर येथील वानाडोंगरी स्थित शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालय आणि महाविद्यालय यांनी मार्च २०२५ रोजी रायपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र श्रम कल्याण मंडळ गट कार्यालय २ यांच्या सहकार्याने हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. सौ. शीतलताई मून आणि सौ. दिपावलिताई कोहाड यांच्या पाठिंब्यामुळे महिलांचे आरोग्य आणि सर्वांगीण कल्याणाची पुष्टी झाली.

शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालयातील अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांनी या शिबिरात महिलांना मोफत आरोग्य तपासणी व उपचार उपलब्ध



करून दिले. या वैद्यकीय चमूत डॉ. विनोद खवासे, डॉ. अमृता क्षीरसागर, डॉ. नयन दुर्बळे आणि सौ. श्वेता सावरकर यांचा समावेश होता. त्यांनी महिलांना योग्य मार्गदर्शन आणि उपचार दिले.

या शिबिरात महिलांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली ज्यात किडनी स्टोन, मूळव्याध, त्वचारोग, मुरूम, उच्च रक्तदाब, मधुमेह, सिकल सेल ॲनिमिया, थायरॉईड विकार, सौंदर्य व केसांचे विकार, वजन नियंत्रण, संधिवात, लहान मुलांचे आजार आणि स्त्रीरोग यांचा समावेश होता. डॉक्टरांनी प्रत्येक महिलेला वैयक्तिक सल्ला आणि होमिओपॅथिक उपचार दिले.

या उपक्रमाचा एकूण ७० महिलांनी लाभ घेतला. महिलांना आवश्यक वैद्यकीय सेवा व सर्वांगीण आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे आणि होमिओपॅथी उपचारांच्या फायद्यांची माहिती देणे हे या शिबिराचे उद्दिष्ट होते.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात महाराष्ट्र श्रम कल्याण मंडळ गट कार्यालय २ यांनी मोठी मदत केली. तसेच, हिंगणा केंद्र समन्वयक सचिन रोंगे आणि जयताळा केंद्र समन्वयक दर्शन सोमकुवर, तसेच धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते शरद पाटील, सौ. वैशाली कोरडे, सौ. वृक्षवंती वरखडे आणि सौ. ऋषिता इवणाते यांनी दिलेल्या विशेष योगदानामुळे आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे शिबिर सुरळीत पार पडले.

शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालय आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत भारबत यांनी सांगितले की, संस्थेतर्फे वानाडोंगरी येथे आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी तज्ज्ञ होमिओपॅथिक डॉक्टरांकडून विशेष क्लिनिक चालवले जात आहेत. या क्लिनिक्समध्ये फक्त २० रुपये फीमध्ये दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, जेणेकरून गरजू आणि वंचित लोकांना सुलभ उपचार मिळू शकतील.

# सणासुदीच्या निमित्ताने खास कलेक्शन्स आणि अतुलनीय सवलतींसह पीएनजी ज्वेलर्स सोबत साजरा करा गुढीपाडवा!

## पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना हे लोकप्रिय कलेक्शन सादर



**मुंबई, २९ मार्च :** महाराष्ट्रातील सर्वात विश्वासार्ह ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएनजी ज्वेलर्स ने नववर्षाच्या निमित्ताने आपले खास कलेक्शन सादर केले आहेत, ज्यात पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना या कलेक्शन्सचा समावेश आहे. गुढीपाडव्याच्यानिमित्ताने २४ मार्च ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोरमध्ये ग्राहकांसाठी आकर्षित सवलती दिल्या जाणार आहेत.

गुढीपाडवा हा नवीन वर्षाची आणि समृद्धतेची सुरुवात मानला जातो. या शुभप्रसंगी पीएनजी ज्वेलर्सच्या मोहिमेत पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही प्रकारातील सोने, चांदी, हीरे, आणि प्लॅटिनमच्या दागिन्यांवर खास सवलती देण्यात आल्या आहेत. लग्नसराई सारख्या महत्वाच्या प्रसंगांसाठी, सणासुदीला भेटवस्तू देण्यासाठी, वैयक्तिक सौंदर्यासाठी या किंवा सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे.

गुढीपाडवा मोहिमेसाठी सादर करण्यात आलेलं मुख्य कलेक्शन म्हणजे पोल्मी, पारंपरिक पोल्की (अनकट) हीरे, पुरातन कारागिरी यांचा संगम असलेले दागिने हे राजेशाही सौंदर्य आणि आधुनिक आकर्षण यांचे प्रतीक आहे. या कलेक्शन मधील प्रत्येक दागिना हा राजेशाही देखावा प्रदान करत असून सर्वांना परवडणारा तसेच प्रत्येक स्त्रीला तिचे सौंदर्य जपण्याची संधी प्रदान करणार आहे.

सोन्याच्या किंमती उच्चांकी पातळीवर पोहोचत असून देखील ग्राहक त्याच उत्साहाने खरेदी करत आहेत. ग्राहक जुने सोने बदलून नवीन दागिने खरेदी करत आहेत, जेणेकरून त्यांना आर्थिक स्थिरता मिळते तसेच सणासुदी किंवा लग्नसराईच्या दागिन्यांची देखील खरेदी होते. गुढीपाडवा हे नव्या वर्षाची सुरुवात असल्याने पारंपरिक आणि स्टडेड दागिन्यांना अधिक महत्व दिले जाते. तसेच सध्या सुरू असलेली महाराष्ट्रीय लग्नसराईमुळे ही मागणी आणखी वाढवत आहे. भारतात सोने हे फक्त किंमतीवर नाही तर भावनिक आणि शुभ प्रसंगी खरेदी केले जाते. त्यामुळे यंदाचा गुढीपाडवा सर्वांसाठी तेजस्वी आणि उत्साही असेल असा आमचा विश्वास आहे. अशी पीएनजी ज्वेलर्स चे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष डॉ सौरभ गाडगीळ यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

या गुढीपाडव्याला खास बनवण्यासाठी पीएनजी ज्वेलर्स ने जुन्या सोन्याच्या बदल्यावर 0% कपात, सोन्याच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये ३०% पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये १००% पर्यंत सूट दिली आहे. या नववर्षाला आणखी आनंदमय करण्यासाठी आजच आपल्या जवळच्या पीएनजी ज्वेलर्स स्टोअरला किंवा पीएनजी ज्वेलर्सच्या ऑनलाइन वेबसाईटला भेट द्या!



# एमओसी कॅन्सर केअर नागपूरची विशेष स्तन कॅन्सर (मॅमोग्राफी) निदान मोहीम

**नागपूर, २९ मार्च :** मार्च महिन्यातील जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एमओसी– नागपूर ने जिल्यात २३ ते २७ मार्च २०२५ दरम्यान विविध ठिकाणी स्तनांच्या कर्करोग तपासणी आणि लवकरच्या टप्प्यात निदानहेतु मॅमोग्राफी शिबिराचे आयोजन केले होते. एमओसी नागपूर चे प्रसिद्ध कर्करोगतज्ञ डॉ. मकरंद रणदिवे यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली सावनेर, मानेवाडा, मिलिट्री हॉस्पिटल कामठी, जरीपटका व मेघरे हॉस्पिटल भंडारा येथे मॅमोग्राफी शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

डॉ. मकरंद रणदिवे यांनी उपस्थित महिलांना स्तनांच्या व इतर कर्करोगाबद्दल विस्तृत माहिती दिली. उपस्थित सर्व महिलांना स्तनांचा, गर्भाशयाचा व गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची लक्षणे कशी ओळखावी याबद्दल माहिती दिली व त्यांचे शंकानिरासनही केले.

शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. मकरंद रणदिवे, डॉ. पूजा चांडक, डॉ. शिवम पुनियानी, डॉ. अदिती गुल्हाने, डॉ. रोहिणी पाटील, डॉ. प्रियंका जेसवानी, डॉ. प्रदीप मेघरे भंडारा व सामजिक कार्यकर्ते श्री. गुड्डू केवलरामानी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबीरात एकूण १५० मॅमोग्राफी करण्यात आल्या व किमान ५०० महिलांनी उत्कृष्ट सहभाग घेत परिसरात जागरूकता निर्माण करण्याचे यशस्वी कार्य पार पडले.

# रॉकी या डायनॅमिक रॉक स्टारच्या रूपात सुधांशु पांडेची वागले की दुनियामध्ये एंट्री

**मुंबई, २९ मार्च :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिका भावनिक दृष्ट्या समृद्ध आणि दैनंदिन जीवनाशी निगडीत कथा सादर करून लहान–थोर सर्वांचे निखळ मनोरंजन करते. या मालिकेत प्रसिद्ध अभिनेता सुधांशु पांडेची एंट्री होणार आहे. वंदनाचा (परिवा प्रणती) कॉलेजचा जुना मित्र रॉकीच्या रूपात तो वागले कुटुंबात येणार आहे. या रॉकस्टारच्या आगमनामुळे वागले कुटुंब काहीसे विस्कळित होणार आहे.



या रोमांचक कथानकात राजेश (सुमित राघवन) आणि वंदनाची मुले एका मोठ्या कॉन्सर्टची तिकिटे न मिळाल्याने हिरमुसतात. पण परिस्थितीला एक आश्चर्यकारक वळण मिळते, जेव्हा वंदना सांगते की त्या कार्यक्रमातील कलाकार रॉकी हा तिचा कॉलेजचा जुना मित्र आहे आणि कधी काळी त्याने एक गाणे म्हणून तिला लग्नाची मागणी देखील घातली होती. हे ऐकल्यावर राजेशला मनातून ईर्ष्या आणि कुतूहल वाटू लागते. जेव्हा रॉकी वागलेंच्या घरी येतो, तेव्हा त्याच्या लौकिकामुळे शेजारपाजारचे लोक त्याला बघण्यासाठी पार वेडे होतात. त्याचा रॉकस्टार अवतार, लांब वाढवलेले केस आणि आकर्षक व्यक्तिमत्व यामुळे तो सर्वांना मोहित करतो. वंदना आपल्या जुन्या मित्राला भेटून अगदी आनंदून जाते. पण असुरक्षितता आणि ईर्ष्या यांच्या भोवऱ्यात अडकलेल्या राजेशला मात्र आपल्याला एक स्पर्धक आल्यासारखे वाटते!

राजेश स्वतःला सावरू शकेल का की रॉकीच्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे राजेशचे जग हादरून जाईल?

आपल्या या भूमिकेविषयी बोलताना सुधांशु पांडे म्हणाला, मला स्वतःला गायला, परफॉर्म करायला आवडते, त्यामुळे रॉकी सारख्या रॉकस्टारची भूमिका करण्याची संधी मला मिळाल्यावर मला आनंदच झाला. ही भूमिका मला लगेच भावली. रॉकी मोहक आहे, त्याच्यात भरभरून आत्मविश्वास आहे, आणि त्याच्यात असे काही गारुड आहे की ज्यामुळे सगळेजण लगेच त्याच्याकडे आकर्षित होतात. पण असे असूनही मुळातून तो साधा आहे आणि आपल्या जुन्या मैत्रीची त्याला कदर आहे. वागले की दुनियाच्या समस्त टीमने खूप आपलेपणा दाखवला. त्यामुळे हा अनुभव माझ्यासाठी आणखीनच आनंददायक झाला. सुमित आणि परिवासोबत काम करण्याचा अनुभव छान होता. अशा मजेदार कथेमध्ये त्यांच्यासोबत अभिनय करताना फार मजा आली.

# शौर्य सॅलरी अकाउंटसाठी बंधन बँकेने भारतीय हवाई दलाशी सामंजस्य करार केला

**मुंबई, २९ मार्च :** बंधन बँकेने आज घोषणा केली की, त्यांनी भारतीय हवाई दलासोबत बंधन बँक शौर्य पगार खाते प्रदान करण्यासाठी एक सामंजस्य करार केला आहे. हे विशेषतः संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी डिझाइन केलेले कॉर्पोरेट पगार खाते आहे. बंधन बँकेच्या १७०० हून अधिक शाखांमधून आयएएफ कर्मचाऱ्यांना झीरो बॅलन्स बचत खाते, स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी संरक्षण, आकर्षक व्याजदर असे अनेक विशेष फायदे मिळू शकतात. शौर्य पगार खात्यासाठी आयएएफ सोबतचे सहकार्य हे बँक संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी एक स्पर्श सेवा केंद्र असण्याव्यतिरिक्तचा फायदा आहे जिथे बँकेने ५५७ नियुक्त शाखांद्वारे संरक्षण पेन्शनधारकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सेवा प्रदान करण्यासाठी स्पर्श सेवा केंद्रे स्थापन करण्यासाठी संरक्षण खात्यांच्या नियंत्रक जनरल सोबत भागीदारी केली आहे.




या सामंजस्य करारावर संरक्षण मंत्रालयाचे सहाय्यक हवाई दल प्रमुख (लेखा आणि हवाई माजी सैनिक) एअर व्हाइस मार्शल उपदेश शर्मा व्हीएसएम आणि बंधन बँकेचे सरकारी व्यवसाय गट प्रमुख देबराज साहा यांनी बंधन बँकेच्या शाखा बँकिंग प्रमुख श्री. सुजॉय रॉय, केंद्र सरकार व्यवसाय प्रमुख श्रीमती स्वाती दत्त यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली.

या भागीदारीबद्दल बोलताना, बंधन बँकेचे कार्यकारी संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी श्री. राजिंदर बब्बर म्हणाले, एक आघाडीची अखिल भारतीय बँक म्हणून, बंधन बँक आमच्या प्रत्येक उपक्रमाद्वारे देशाला पाठबळ देण्यासाठी वचनबद्ध आहे.

# अभिनेता तन्मय नागर दिसणार पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत

**मुंबई, २९ मार्च :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील पुष्पा (करुणा पांडे) या एका धडाडीच्या आणि करारी स्त्रीच्या प्रेरणादायक कथेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. पुष्पा तिच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला हिंमतीने आणि सकारात्मकतेने तोंड देताना दिसते. कथानकाला आता एक वेगळे वळण मिळणार आहे आणि या वळणावर तन्मय नागर हा कलाकार अर्जुन सिंह शेखावतच्या रूपात मालिकेत प्रवेश करणार आहे.

प्रख्यात शेखावत मसाले साम्राज्याचा वारस अर्जुन मोठ्या घराण्यातील मुलगा असून त्याचे व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे आहे. त्याच्यात एक मोहकता आणि आत्मविश्वास आहे पण त्याच्या मागे एक विचित्रपणा आहे. त्याचे संगोपन एका रूढीवादी आणि हिंसक कुटुंबात झाल्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे बनले आहे, मात्र वरकरणी सभ्यतेचा मुखवटा तो मिरवत असतो.

अर्जुन सिंह शेखावतची भूमिका करणारा तन्मय नागर या मालिकेत दाखल होत असल्याचा आनंद व्यक्त करताना म्हणतो, पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत काम करताना आणि अर्जुन सिंह शेखावत ही भूमिका साकारताना मला खूप आनंद होत आहे. मी यापूर्वी साकारलेल्या भूमिकांपेक्षा ही भूमिका अगदी वेगळी आहे. अर्जुनच्या व्यक्तिमत्त्वात अनेक स्तर आहेत आणि ते एक आवेगी आणि जटिल व्यक्तिमत्त्व आहे. अर्जुन अशा जगातून आला आहे, जेथे रूढींचे अवास्तव महत्त्व आहे. त्याचे लहानपण फारसे चांगले गेलेले नाही. त्यामुळे एक अभिनेता म्हणून या व्यक्तिमत्त्वाचे पदर उलगडण्यात एक आव्हान आहे. अर्जुन सर्वसाधारण नायक किंवा खलनायक नाही. तो अनेक दोष, विरोधाभास आणि तीव्र भावनांनी भरलेला एक माणूस आहे. त्यामुळे लोकांना ते जिवंत व्यक्तिमत्त्व वाटेल. मालिकेत पुढे नाट्य, रोमान्स आणि अनपेक्षित ट्विस्ट भरपूर आहेत, जे प्रेक्षकांना खिळवून ठेवतील.

# सोनी सबचे कलाकार गुढी पाडव्याच्या आपल्या सुंदर आठवणी शेअर करत आहेत

**मुंबई, २९ मार्च :** गुढी पाडवा म्हणजे मराठी लोकांचे नवे वर्ष आणि विविध वैज्ञानिक, धार्मिक आणि शेतकी कारणांमुळे हा दिवस लक्षणीय असतो. या सणाच्या निमित्ताने सोनी सबवरील कलाकार सरिता जोशी, आदित्य रेडिज, सायली साळुंखे, चिन्मयी साळवी आणि जयेश मोरे आपल्या गुढीपाडव्याच्या स्मृतींना उजाळा देत आहेत आणि यंदा ते काय करणार आहेत हे देखील शेअर करत आहेत.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत राधा काकूची भूमिका करत असलेली सरिता जोशी म्हणते, गुढी पाडव्यापासून आमचे नवे वर्ष सुरू होते. आपल्या कुटुंबसमवेत नवी सुरुवात आणि सणाचा आनंद घेण्याचा हा सण आहे. दर वर्षी या दिवशी मी पारंपरिक महाराष्ट्रीयन पोशाख करते, पूजा करते आणि सगळ्यांना आवडणारे गोड-धोड पदार्थ करते. घराबाहेर उभारलेली गुढी हे समृद्धी आणि यशाचे प्रतीक आहे. नववर्षाची सुरुवात सकारात्मक मनाने करण्याची यादही गुढी देते. लहान असताना त्या गुढीवर घातलेल्या गाठीच्या माळेवर माझा डोळा असे. गुढी उतरवल्यानंतर आम्हाला ती मिळत असे. आजही या दिवशी सिद्धिविनायक मंदिरात दर्शन करून आल्यावर मन कृतज्ञता आणि आशेने भरून जाते. सर्वांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा हे वर्ष सर्वांसाठी सुख, आरोग्य आणि यश घेऊन येवो!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा अभिनेता जयेश मोरे म्हणतो, मी सर्वसाधारणपणे सकाळी लवकर माझ्या कुटुंबीयांसह पूजा करतो आणि मग आम्ही सगळे मिळून न्याहारी करतो. मला हा सण खूप प्रिय आहे कारण मी लहान असताना या दिवशी श्रीखंड पुरीचा बेत असायचा. मला अशा आहे की या गुढी पाडव्याला लोक थोडा श्वास घेऊन सरलेल्या वर्षाबद्दल चिंतन करतील आणि नववर्ष कसे असावे याची कल्पना करतील. सर्वांना गुढी पाडव्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करत असलेली सायली साळुंखे म्हणते, गुढी पाडवा हा माझा आवडता सण आहे. लहानपणी मी बघितले आहे की माझी आई आणि आजी गुढीपाडव्याची जय्यत तयारी करत. या दिवशी आम्ही खरेदी करतो आणि घर सुशोभित करतो. या सणाशी माझ्या सुंदर आठवणी निगडीत आहेत. आईसोबत गुढीसाठी एक छानशी साडी शोधण्याची आठवण त्यातलीच एक आहे. माझ्या कुटुंबाची परंपरा आजही तशीच सुरू आहे. मी देखील दर वर्षी माझ्या कुटुंबासमवेत गुढी उभारते, ती सुशोभित करते. श्रीखंड, पुरी, बटाट्याची भाजी आणि इतर पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेतल्याशिवाय या सणाचा आनंद पूर्णच होत नाही. माझ्या सर्व चाहत्यांना मी विनंती करेन की त्यांनी प्रेमाने आणि भक्तीने हा सण साजरा करावा. वागले की दुनिया मालिकेत सखीची भूमिका करणारी चिन्मयी साळवी म्हणते, गुढी पाडवा म्हणजे आपल्या कुटुंबासोबत आणि मित्रमंडळींसोबत एकत्र मिळून आनंद साजरा करण्याचे पर्व. आम्ही पारंपरिक पद्धतीने घराच्या बाहेर दिसेल अशी उंच गुढी उभारतो. ही गुढी म्हणजे समृद्धी आणि भाग्याचे प्रतीक आहे. मला गुढी सजवायला खूप आवडते.

## राशीभविष्य

**मेष :** तुम्हाला वडिलोपार्जित संपत्ती मिळू शकते. सहकाजयामुळे व्यवसायात प्रगतीसह लाभ होईल. ऑफीसमध्ये महत्त्वाच्या जबाबदाजया मिळू शकतात. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आज काही महत्त्वाच्या कामात काही अडथळे येऊ शकतात. दूरदर्शी दृष्टीकोन चांगला राहील. लोकांच्या बोलण्यातून दिशाभूल होऊ देऊ नका. यशाने उत्साही व्हाल. आपल्या कामासाठी समर्पित रहा.

**मिथुन :** कला आणि अभिनयाच्या जगाशी निगडित लोक महत्त्वपूर्ण कामगिरी करतील. नोकरीच्या ठिकाणी अपूर्ण काम पूर्ण करून आर्थिक लाभ होईल. अनुभव आणि ज्ञानाच्या बळावर तुम्ही पुढे जात रहाल.

**कर्क :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या बॉस आणि सहकाजयांमुळे काही गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. कामाच्या ठिकाणी बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. आज तुम्ही एखाद्या प्रिय मित्रासोबत मनोरंजनाचा आनंद घ्याल. प्रेमप्रकरणात अडथळ्यांना सामोरे जावे लागेल. जास्त जोखीम घेणे टाळा.

**कन्या :** आर्थिक बाजू चांगली राहील. मित्र तुम्हाला साथ देतील. प्रवास करताना काळजी घ्या. अन्यथा समस्या उद्भवू शकतात. नवीन व्यवसाय सुरू करण्याची योजना यशस्वी होईल.

**तुळ :** मुलांच्या बाजूने अनावश्यक तणाव जाणवेल. अभ्यासात रस कमी वाटेल. जुन्या मित्राकडून चांगली बातमी मिळेल. व्यवसायाची स्थिती सुधारेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**वृश्चिक :** घरगुती समस्यांमुळे वैवाहिक जीवनात परस्पर मतभेद कमी होऊ शकतात. रागटाळा. आज दिवसाची सुरुवात तणावाने होईल. तुम्ही केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय दुसरे कोणीतरी घेण्याचा प्रयत्न करेल.

**धनु :** सामाजिक कार्यात सुख-सुविधा वाढतील. कार्यक्षेत्रात अनावश्यक दबाव वाढू शकतो. समन्वयाचे वर्तन ठेवा. इतरांची दिशाभूल करू नका. व्यवसायात नवीन करारांमुळे व्यवसायाची स्थिती सुधारेल.

**मकर :** आज भाऊ-बहिणींकडून साथ, पाठिंबा मिळाल्याने समाधान मिळेल. घरात जुन्या नातेवाईकाच्या आगमनाने आनंद होईल. वैवाहिक जीवनातील अडथळे दूर होतील.

**कुंभ :** प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. नोकरीत उच्च अधिकाजयांशी विनाकारण वाद होऊ शकतात. जवळच्या मित्रासोबत संगीत किंवा मनोरंजनाचा आनंद घ्याल. नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल.

**मीन :** व्यवसायाच्या क्षेत्रात सुरू असलेल्या कामाचा लाभ मिळेल. उपजीविकेच्या क्षेत्रात तुम्हाला अतिरिक्त मेहनत आणि जबाबदारी मिळेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. नोकरीत नवीन मित्र मिळतील.


## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कूळगाव, पिन ४२१५०१, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईट : khmc.gov.in

फुवनप/ई–गव्ह/१६३/२०२४–२५ दिनांक : २८/०३/२०२५

**शुद्धीपत्रक**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. त्यानुसार कुवनपच्या PMAY योजने अंतर्गत मंजूर सदनिकांच्या सोडतीकरिता वापरण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीचे क्लाऊड होस्टिंग करणेकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून २१/०३/२०२५ ते दि. २८/०३/२०२५ रोजी दुपारी ३.00 वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात आले होते. तथापी सदर निविदेस योग्य प्रतिसाद न मिळाल्याने सदर दरपत्रक स्विकृतीचा कालावधी दि. ०१/०४/२०२५ रोजी दुपारी ३.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. तसेच सदरची निविदा दि.०२/०४/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर अथवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येईल.

मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव.



सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## आरोग्य पथक पालघर

जन औषध वैद्यक शास्त्र विभाग, ग्रँट शासकीय वैद्यकिय महाविद्यालय मुंबई अंतर्गत
☎ ०२५२५-२५२०११ कचेरी रोड, ता.पालघर, जि.पालघर, ४०१४०४ huprhtcpalghar@gmail.com

क्र.आपपा/यंसाख/निविदा सुचना/ /२०२५ दि.१२/०३/२०२५

**ई-निविदा सुचना**

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या आरोग्य पथक, पालघर येथे आवश्यक यंत्रसामुग्री/साधन सामुग्री खरेदी करीता केवळ उत्पादक/आयातदार/उत्पादकांचे अधिकृत पुरवठादार निविदेत सहभागी होण्यास पात्र आहेत. उत्पादक/आयातदार/उत्पादकांचे अधिकृत पुरवठादार यांच्याकडून विहीत नमुन्यात ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने मार्गवित आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

निविदेचा तपशिल खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा प्रसिध्दीचा दिनांक | दि.२८.०३.२०२५ सकाळी १०.०० वाजता |
| २ | ई-निविदा विक्री व डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.२८.०३.२०२५ ते दि.१५.०४.२०२५ - संध्या. ०५.०० वाजेपर्यंत |
| ३ | निविदा पुर्व बैठकीचा दिनांक व वेळ | दि.०१.०४.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता. |
| ४ | ई-निविदा विक्रीचा व सादर करण्याचा शेवटचा दिवस | दि.१५.०४.२०२५ - संध्या.५.०० वाजेपर्यंत |
| ५ | तांत्रिक निविदा क्र. १ उघडण्याचा दिनांक | दि.१६.०४.२०२५ संध्या ०६.३० वाजता |
| ६ | निविदा पुर्व बैठकीचा दिनांक व वेळ | बैठकीचे ठिकाण- सहयोगी प्राध्यापक, जन औषध वैद्यक शास्त्र विभाग, पालघर – ४०१४०४. |

| अ. क्र. | ई-टेंडर क्र. | यंत्रसामुग्रीचे नांव | संस्थेचे नाव | अनामत रक्कम | निविदा शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १. | E-०२ (२४-२५) | सप्लाय ऑफ व्हेरीयस मेडीसीन अॅज मेन्शन इन बीओक्यु | आरोग्य पथक, पालघर | १,०९,००० | १९,००० |

उपरोक्त निविदा सूचनेतील अधिक माहितीकरिता इच्छूक निविदाकारांनी https://mahatenders.gov.in., या संकेतस्थळांवर संपर्क साधावा.

सहभागी होणाऱ्या निविदाकारांना निविदा शुल्क दिनांक ३१.०३.२०२५ रोजी संध्या. ०५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी ऑनलाईन भरणा करावी लागेल.

निविदेचे वेळापत्रक व अटी व शर्ती संबंधी अधिक माहिती **https://mahatenders.gov.in.** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. आरोग्य पथक, पालघर यांना निविदेतील बाबींची संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**संकेत स्थळ : https://mahatenders.gov.in , Email :-huprhtcpalghar@gmail.com**

**सहयोगी प्राध्यापक,**
**जन औषध वैद्यक शास्त्र विभाग,**
**आरोग्य पथक, पालघर**

DGIPR-2024-25/No.-5/C7402

# राष्ट्रवादीचा संभाजी भिडेंवर घणाघात

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, : छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते असा वादग्रस्त दावा करणाऱ्या संभाजी भिडे यांच्यावर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसने टीकेची झोड उठवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी भिडेंवर निशाणा साधत आंब्याचा सिझन आल्यामुळे ते असे बरळत असल्याची टीका केली आहे. स्वतः अजित पवारांनीही शिवरायांच्या स्वराज्यात सर्वच जाती धर्माच्या लोकांना स्थान होते असे नमूद करत भिडे यांचा दावा खोडून काढला आहे.



अमोल मिटकरी यासंबंधी अकोल्यात बोलताना म्हणाले की, सध्या आंब्याचा सिझन आला आहे. त्यामुळे संभाजी भिडे बेताल बरळत आहेत. त्यांनी बहुजन समाजातील पोरांना हाताशी धरून इतिहासाची मोडतोड करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी शिवाजी महाराजांवर आक्षेपार्ह विधान करणाऱ्या प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर व विकृत इतिहास लिहिणाऱ्या राम गणेश गडकरी यांच्यावर बोलावे. ते यांच्यावर का बोलत नाहीत? अमोल मिटकरी यांनी यावेळी आता संभाजी भिडे यांची व्हॅलिडीटी संपल्याचा टोलाही हाणला.

### अजित पवारांनीही दावा खोडला

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही संभाजी भिडे यांचा दावा खोडून काढला आहे. संभाजी भिडे त्यांना वाटेल ते बोलू शकतात. पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्यात सर्वच जाती धर्माचे लोक सुखाने नांदत होते.

शिवाजी महाराज एक आदर्श राजे होते. रयतेचे राजे होते. सर्वांनीच राजा म्हणून त्यांचे नेतृत्व स्वीकारले होते, असे ते कोल्हापुरात बोलताना म्हणाले.

सरकारमध्ये असो वा विरोधी पक्षात, राजकीय नेत्यांनी आपल्या विधानातून सामाजिक तेढ निर्माण होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने मुस्लिम राहतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत देखील अनेक मुस्लिमांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या विधानांच्या मागचा हेतू मला समजला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही जाती किंवा पंथाच्या आधारावर कुणाशी भेदभाव केला नाही. हा इतिहास आहे आणि तो सर्वमान्य आहे, असेही अजित पवार यावेळी ठणकावून म्हणाले.

### आता पाहू काय म्हणाले होते संभाजी भिडे?

शिवप्रतिष्ठाने हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी

**आंब्याचा सिझन आल्याने भिडे बरळतोय, अमोल मिटकरींची टीका; अजित पवारांनीही घेतला समाचार**

रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या शिल्पाचे समर्थन केले होते. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते असा वादग्रस्त दावा केला होता.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते. शिवाजी महाराज व संभाजी महाराजांनी शहाजी राजे यांचा हिंदवी स्वराज्याचा विचार पुढे नेला. पण आपल्याकडील प्राध्यापक, शिक्षक हे चुकीचा इतिहास मांडत आहेत, असे ते म्हणाले होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे मंत्री नीतेश राणे यांनीही काही दिवसांपूर्वी संभाजी भिडे यांच्यासारखाच एक दावा केला होता.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात एकही मुस्लिम सैनिक नव्हता. त्यांची लढाई मुस्लिमांविरोधात होती, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचेही राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते.

## तर आदित्य ठाकरे यांची देखील नार्को टेस्ट करायला पाहिजे; दिशा सालियन प्रकरणात कदमांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, : शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेतली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. नुकतंच अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडलं, यावरून त्यांनी निशाणा साधला, हे अर्थसंकल्पीय अधिवेश निरर्थक असल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. तसेच यावेळी बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांच्या या टीकेनंतर आता शिवसेनेचे नेते चांगलेच आक्रमक झाले आहेत. उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांच्यानंतर रामदास कदम यांनी देखील उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

### नेमकं काय म्हणाले कदम?

उध्दव ठाकरे आता वेडे होऊन दगडं मारायचे बाकी आहेत. उध्दव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत असणाऱ्या सर्व नेत्यांना संपवण्याचं पाप केलं आहे. त्यांना त्याची शिक्षा भोगावीच लागणार आहे. खरी शिवसेना आमचीच आहे, असं कदम यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी दिशा सालियन प्रकरणावरून देखील निशाणा साधला आहे. मुलाला



वाचवण्यासाठी पुरावे नष्ट केले आहेत का? याची चौकशी होणे गरजेचं आहे. किशोरी पेडणेकर नेहमी दिशा सालियन प्रकरणात घरी का जायच्या? याचाही तपास होणे गरजेचे आहे.

दिशा सालियनच्या वडिलांची नार्को टेस्ट करा अशी मागणी होत असेल तर आदित्य ठाकरेंची देखील नार्को टेस्ट व्हायला हवी, अशी मागणी या प्रकरणात कदम यांनी केली आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी संतोष देशमुख प्रकरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मीक कराड याच्या सहकाऱ्यांनी हत्येची कबुली दिली आहे, त्यामुळे आता त्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, बीड जिल्ह्यात २०० हून अधिक रिव्हॉल्व्हरचे परवाने देण्यात आले, परवाने देण्यासाठी कोणाच्या शिफारशी होत्या याचीही चौकशी व्हायला हवी.

या प्रकरणात धनजंय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा किती सहभाग आहे याचीही चौकशी व्हायला हवी, अशी मागणी कदम यांनी केली आहे.

## नुसते विधान भवनात येतात अन, ठाकरेंच्या आरोपांना सामंतांचं खोचक प्रत्युत्तर



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन राज्यातील महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. नुकतंच राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडलं या अधिवेशनावरून त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. अर्थसंकल्पीय अधिवेशन निरर्थक होतं. अपयश लपवणारं अधिवेशन होतं, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला आहे. दरम्यान त्यानंतर आता मंत्री उदय सामंत यांनी उद्धव ठाकरे यांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

### नेमकं काय म्हणाले उदय सामंत?

उद्धव ठाकरे यांनी एक पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली, त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये विस्तव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांची दोस्ती पक्की आहे. उद्धव ठाकरे बालिशपणा करत आहेत, शिवसेना खरी कोणाची? हे न्यायालयाने आधीच सिद्ध केलं आहे. आम्ही ८० जागा लढलो ६० जागा जिंकलो, ते फक्त २० जागाच जिंकले, त्यांच्या हातात आता काही राहिलं नाही, ते काँग्रेसच्या तालावर नाचत आहेत, असा हल्लाबोल सामंत यांनी यावेळी केला आहे

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, काँग्रेसबरोबर जाऊन त्यांनी बाळासाहेब यांच्यासोबत गद्दारी केली. सौगात हा मोदींचा उपक्रम आहे. यांनी फेक नरेटीव्ही सेट केला आहे. आम्ही पाकिस्तानचं समर्थन करत नाही, यांनी कंगनाच्या घरावर कारवाईसाठी बुलडोझर पाठवला. राणे साहेबांना अटक करण्यासाठी पोलीस पाठवले. यांनी जे कृत्य केले ते पुसले जाणार नाहीत असं सामंत यांनी म्हटलं आहे. अधिवेशनामध्ये प्रत्येक घोषणेवर चर्चा झाली आहे. आम्ही आमचा अजेंडा पाच वर्षांमध्ये पूर्ण करणार आहोत. यांना जे जमले नाही ते आम्ही केले आहे. गिरीश महाजन यांना एका प्रकरणात यांनी अटकवण्याचा प्रयत्न केला. नुसती विधान भवनात येऊन पत्रकार परिषद घेतात. यांनी आधी काम पूर्णपणे समजून घेणं गरजेचं आहे, असंही यावेळी उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

## राज्यातील ६४ लाख शेतकऱयांना मोठा दिलासा!

### कोटी विमा नुकसान भरपाई मिळणार

**मुंबई :** राज्यातील लाख शेतकजयांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार, त्यांच्या बँक खात्यात थेट ?२५५५ कोटी विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून २८५२ कोटी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे मागील काही हंगामांतील प्रलंबित विमा नुकसान भरपाई शेतक ?यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा केली जाणार आहे. या प्रक्रियेस गती देण्यासाठी विमा कंपन्यांना तातडीने ही रक्कम शेतक ?यांच्या खात्यावर जमा करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतक ?यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

**खरीप २०२२ आणि रब्बी२०२२२३२.८७ कोटी**
**खरीप २०२३ -९८१ कोटी**
**रब्बी २०२३२४-६३.१४. कोटी**
**खरीप २०२४२३०८ -कोटी**

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, ही नुकसान भरपाई शेतकजयांच्या खात्यावर तातडीने जमा केली जाईल. यामुळे शेतकजयांना आर्थिक स्थैर्य मिळेल आणि त्यांना शेतीसाठी नवीन आर्थिक आधार निर्माण होईल. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतक ?यांना मोठा दिलासा मिळणार असून, शासनाच्या या पावलामुळे शेती क्षेत्राला बळकटी मिळेल, असे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केले.

## नाशिकच्या त्र्यंबकेश्वर देवस्थानाला वर्ग 'अ' दर्जा जाहीर

**नाशिक :** येथील त्र्यंबकेश्वर मंदिराला 'अ' वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे. आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर देवस्थानाला वर्ग 'अ' दर्जा जाहीर करण्यात आला. राज्याच्या नगरविकास खात्याने या निर्णयाला मंजुरी दिली. विभागीय आयुक्तांकडून या संबंधीचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. आगामी कुंभमेळा आणि बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याने 'अ' दर्जा मंदिर घोषित करण्यात आले आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून, त्र्यंबकेश्वर मंदिर हे अत्यंत पवित्र शिव मंदिर मानले जाते. मंदिराच्या स्थापत्यकलेवर हेमाडपंथी शैलीचा प्रभाव आहे, जी त्याच्या गुंतागुंतीच्या दगडी कोरीव कामासाठी ओळखली जाते. मंदिराला 'अ' वर्गाचे मंदिर म्हणून घोषित करणे त्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्वामुळे देखील महत्त्वाचे आहे. या काळता राज्य सरकारने सुधारित रस्ते, वाहतूक व्यवस्था आणि निवास पर्यायांसह विविध पायाभूत सुविधांच्या विकासाची योजना आखली आहे.

**मंदिराची काही प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत**

**तीन लिंगे:** मंदिरात ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचे प्रतिनिधित्व करणारे तीन लिंगे आहेत.कुशावर्त कुंड: मंदिर संकुलातील एक पवित्र तलाव, जो गोदावरी नदीचा उगम मानला जातो. गोदावरी नदी: ही नदी त्र्यंबकजवळून उगम पावते आणि भारतातील सर्वात लांब नद्यांपैकी एक आहे. नाशिकमध्ये येणारा कुंभमेळा १४ जुलै ते २५ सप्टेंबर २०२७ या कालावधीत होणार आहे. हा महत्त्वाचा धार्मिक कार्यक्रम दर १२ वर्षांनी येतो आणि लाखो भाविक, साधू आणि यात्रेकरूंना आकर्षित करतो. जे पवित्र गोदावरी नदीत पवित्र स्नान करण्यासाठी एकत्र येतात.

# दिशा सालियन वडिलांच्या अफेअरमुळे होती त्रस्त

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, : बॉलिवूड अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात एक नवा खुलासा झाला आहे. त्यानुसार, दिशा आपल्या वडिलांच्या अफेअरमुळे परेशान झाली होती. संबंधितांना पैसे देऊन ती पुरती थकली होती. यामुळे आलेल्या आर्थिक वैफल्यातून तिने स्वतःचे आयुष्य संपवून घेतले, असे मालवणी पोलिसांच्या यापूर्वीच्या क्लोजर रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणी सध्या राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपाच्याजोरदार फैरी झडत आहेत. त्यातच आता मालवणी पोलिसांनी यापूर्वी दाखल केलेल्या आपल्या क्लोजर रिपोर्टमध्ये वरील नवी माहिती उजेडात आली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, दिशा सालियान वडिलांच्या अफेअरमुळे संबंधितांना पैसे देऊन थकली होती. कष्टाने कमावलेला पैसा नको त्या गोष्टींवर खर्च होत असल्यामुळे ती खचली होती. तिने आपल्या मित्रांशीही ही गोष्ट बोलून दाखवली होती. याच आर्थिक तणावातून नंतर तिने आत्महत्या केली. यापूर्वी झालेल्या शवविच्छेदन अहवालात दिशावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार झाला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या अहवालात डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला होता.

### मालवणी पोलिसांच्या रिपोर्टमध्ये नेमके काय?

दिशा सालियनने ८ जून २०२० रोजी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर मालवणी पोलिसांनी तपास करुन एक अहवाल सादर केला होता.



त्यात दिशाचे काही प्रोजेक्ट्स अयशस्वी झाले होते, मित्रांशी खटके उडाले होते, अशा कारणांचा उल्लेख होता. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे दिशाच्या वडिलांनीच लेकीने कष्टाने कमावलेले पैसे आपल्या ऑफिसमधील महिला कर्मचाऱ्यावर उधळल्याचेही यात नमूद आहे. दिशाने ही गोष्ट तिच्या काही मैत्रिणींना आणि तिच्या होणाऱ्या नवऱ्यालाही सांगितली होती. २ जून २०२० रोजी दिशाने यासंबंधी आपल्या वडिलांना जाब विचारला आणि त्यानंतर ती तिचा होणारा नवरा रोहन रॉय याच्या जनकल्याण नगरमधील फ्लॅटवर राहायला गेली.

दिशाच्या मृत्यूनंतर पोलिसांनी पुरावे गोळा केले आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर त्यांनी दिशाने आत्महत्या केल्याचा अंतिम निष्कर्ष काढला. ४ फेब्रुवारी २०२१ रोजी हा क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला. सतीश सालियन यांनी आता पुन्हा याचिका दाखल करून काही बड्या असामींवर आरोप केले आहेत. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

### मृत्यूनंतर ३ दिवसांनी झाले होते शवविच्छेदन

उल्लेखनीय बाब म्हणजे दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. त्यानंतर ३ दिवसांनी तिचे

**मित्रांशी केली होती चर्चा; आर्थिक तणावातून आयुष्य संपवल्याचा क्लोजर रिपोर्टमध्ये दावा**

शवविच्छेदन झाले होते. त्यात दिशाच्या हात, पाय व छातीवर जखमा झाल्याचा उल्लेख आहे. विशेषतः तिच्या डोक्याला गंभीर जखम झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे या रिपोर्टमध्ये नमूद आहे. एवढेच नाही तर दिशाच्या नाक व तोंडातून रक्त येत असल्याचेही या रिपोर्टमध्ये अधोरेखित करण्यात आले आहे. पण तिच्यावर कोणताही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झाल्याची नोंद त्यामध्ये नाही.

### दिशाच्या वडिलांनी मुंबई सीपींची घेतली होती भेट

दुसरीकडे, दिशा सालियनच्या वडिलांनी आपल्या वकिलांसह नुकतीच मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपल्या मुलीच्या कथित हत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

या प्रकरणी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करत या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आदित्य ठाकरे यांना वाचवण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला, असा त्यांचा आरोप आहे.

एवढेच नाही तर आदित्य ठाकरे यांचा ड्रगजच्या व्यापारात हात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या आरोपांमुळे राज्याचे राजकारण अधिकच तापण्याची चिन्हे आहेत.

# दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूआडून राजकारण करू नये

### संजय राऊत यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, : बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून ठाकरे गटाचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मोठा आरोप केला आहे. दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूचा वापर करून राजकारण करू नये, अशी टीका त्यांनी केली. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण तापले आहे. आता या प्रकरणात मालवणी पोलिसांनी दिलेल्या क्लोजर रिपोर्टमधून धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. या अहवालानुसार, दिशाच्या आत्महत्येमागे कौटुंबिक कारणे आणि आर्थिक विवंचना जबाबदार होती. या पार्श्वभूमीवर संजय



राऊत म्हणाले, काल पोस्टमार्टमचा रिपोर्ट आला असून, आमच्यासाठी हा विषय संपला आहे. आपल्या मुलीच्या मृत्यूचा आधार घेत राजकारण करू नका. शवविच्छेदन अहवालातून सत्य समोर आले आहे. ते पुढे म्हणाले, त्या मुलीला डिप्रेशन होतं, हे तिच्या कुटुंबाचा आणि वैयक्तिक आयुष्याचा भाग आहे. आम्हाला त्यावर राजकारण करायचे नाही. मात्र, आता पाच वर्षांनी तिच्या वडिलांना हाताशी धरून काही लोक राजकारण करत आहेत, त्यांना लखलाभ होवो! संजय राऊत यांनी शिवसेना शिंदे गटावरही जोरदार हल्ला चढवला. त्यांनी म्हटले, आम्ही कुठल्याही गोष्टीला तोंड देण्यासाठी समर्थ आहोत.

मात्र, या प्रकरणाचा वापर करून काही लोक महाराष्ट्राच्या पहिल्या क्रमांकाच्या ठाकरे कुटुंबावर चिखलफेक करू इच्छित आहेत. बाळासाहेब ठाकरेंचे फोटो लावून स्वतःला त्यांचे विचार वाहक म्हणणाजयांनी लाज बाळगली पाहिजे. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून आता राजकीय आरोप-प्रत्यारो वाढले असून, शिंदे गट आणि ठाकरे गटामध्ये नवीन संघर्ष निर्माण झाला आहे.

संजय राऊत यांच्या या वक्तव्यावर शिंदे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## भुजबळ-मुंडेसमित्यांबाहेर, अजित पवारांचा डाव?

### राष्ट्रवादीत अंतर्गत धक्का!

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, : महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा राजकीय उलटफेर घडला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील दोन दिग्गज नेते छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना विधिमंडळाच्या समित्यांमध्ये स्थान न मिळाल्याने राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. अजित पवारांनी आपल्या पक्षातील या दोन वरिष्ठ नेत्यांना डावलल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले असून, हा पक्षांतर्गत बदलाच्या दिशेने मोठा संकेत मानला जात आहे.राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीतील महत्त्वाचे नेते असलेल्या भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना यावेळी विधिमंडळाच्या कोणत्याही समितीत स्थान देण्यात आले नाही. हा निर्णय पक्षाच्या अंतर्गत रणनीतीचा भाग असल्याचे बोलले जात आहे. भुजबळ मागील काही काळापासून पक्षात नाराजी व्यक्त करत होते, तर मुंडेंवर भ्रष्टाचाराचे आरोप आणि वादग्रस्त प्रकरणांमुळे पक्षावर टीका होत होती. या पार्श्वभूमीवर, या दोघांना समित्यांमधून बाजूला ठेवण्याचा निर्णय हा पक्षाच्या प्रतिमेला डाग लागू नये, या दृष्टीने घेतला असावा, अशी शक्यता राजकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. विधिमंडळाच्या विविध समित्यांमध्ये पक्षाच्या इतर आमदारांना संधी देण्यात आली असून, अनेकांनी प्रमुख पदेही मिळवली आहेत. मात्र, भुजबळ आणि मुंडे यांना संधी न देणे, हा पक्षांतर्गत बदलाचा स्पष्ट संकेत मानला जात आहे. पक्षातील गटबाजी, आगामी निवडणुकीच्या रणनीती आणि स्वच्छ प्रतिमेचा आग्रह या निर्णयामागे असू शकतो. या निर्णयामुळे विरोधकांना राष्ट्रवादीवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. भुजबळ आणि मुंडे यांना वगळण्यामागे नेमका हेतू काय, हे अजून स्पष्ट झालेले नाही.

## लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदावरून शरद पवार गट नाराज

### महाविकास आघाडीत तणाव!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात महाविकास आघाडी अंतर्गत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदावरून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात मतभेद उफाळले आहेत. काँग्रेसने हे पद आपल्या गटनेते विजय वडेट्टीवार यांना दिल्याने शरद पवार गटाच्या आमदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयामुळे शरद पवार गटाला दुर्लक्षित केल्याची भावना निर्माण झाली असून, आघाडीत अंतर्गत अस्वस्थता वाढली आहे. लोकलेखा समिती हे विधिमंडळातील एक महत्त्वाचे पद मानले जाते. ही समिती सरकारच्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवण्याचे काम करते. अशा परिस्थितीत, काँग्रेसने हे पद स्वतःकडे ठेवण्याचा निर्णय घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नाराज झाला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शरद पवार गटातील काही आमदारांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार नोंदवली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, महाविकास आघाडीत सर्व घटक पक्षांना समान सन्मान आणि संधी मिळायला हवी, परंतु काँग्रेसच्या या निर्णयाने असंतोष निर्माण झाला आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी आपल्या आमदारांना आश्वासन दिले आहे की, महाविकास आघाडीच्या पुढील बैठकीत हा विषय उपस्थित करून योग्य निर्णय घेतला जाईल. शरद पवार यांच्या या भूमिकेमुळे आघाडीत तणाव निवळण्याची शक्यता आहे. मात्र, काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

**आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह?**

या घडामोडीमुळे महाविकास आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नाराजीमुळे आघाडीतील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत, जे आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम करू शकतात.

# सौगातएमोदी वरून प्रकाश आंबेडकरांचा निशाणा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, : भाजपने सौगत-ए-मोदीमोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत, देशभरातील लाख वंचित मुस्लिमांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट दिली जात आहेत. भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीने या मोहिमेची जबाबदारी घेतली आहे. देशातील हजार मशिदींसह भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीचे हजार कार्यकर्ते गरजूंना हे किट पोहोचवतील. यासाठी प्रत्येक मशिदीतील लोकांना मदत करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यावर आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली आहे. रक्तात माखलेले 'सौगात-ए-मोदीशा प्रकारे आंबेडकर यांनी या किटचे वर्णन केले आहे. या संदर्भात प्रकाश आंबेडकर म्हणाले की, 'सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली' या वाक्याचा प्रत्यय येत आहे. मोदी लाख मुस्लिम बांधवांना या रमजानच्या शुभेच्छा देत आहेत. मात्र मुस्लिमांनो, जागे व्हा आणि मित्र आणि शत्रू मधील फरक ओळखा, असे आवाहन देखील आंबेडकर यांनी केले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, जे हात मुस्लिमांच्या रक्ताने भिजलेले आहेत -गुजरातपासून ते मॉब लिंचिंगमध्ये



मरण पावलेल्या प्रत्येक मुस्लिमापर्यंत... आज मुस्लिमांना खजूर आणि शेवया देऊन त्यांना आकर्षित करायचे आहे. तबरेज अन्सारी, मोहम्मद अखलाक, जुनैद खान, अलिमुद्दीन अन्सारी, पेहलू खान, मोहसीन शेख, मोहम्मद कासिम, सिराज खान, जैनुल अन्सारी, रकबर खान आणि त्यांच्या द्वेषाला बळी पडलेल्या नावांना मुस्लिम विसरले आहेत का? च्या दंगलीत बिल्किस बानोच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करून एखादा मुस्लिम सलवार-कमीज आणि कुर्ता-पायजमा घालेल का? प्रेषितांच्या आदरापोटी मुस्लिम मूर्खपणाकडे दुर्लक्ष करून ड्रायफ्रुट्स खातील का? अलीकडे वक्फ तरमीम विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या भूमीला लक्ष्य केले जात आहे. देशभरात बुलडोझरद्वारे मुस्लिमांची अस्मिता पायदळी तुडवली जात आहे. सर्व परिस्थिती असतानाही मुस्लीम कोणत्या तोंडाने मोदींची भेट स्वीकारण्यास तयार आहे? मुस्लिमांच्या प्रत्येक प्रश्नात आणि प्रत्येक दुःखात त्यांच्या पाठीशी उभे राहणारे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून पवित्र धाग्यासाठी मते मागणारे मौलवी आज गप्प का आहेत? असे प्रश्न ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केले आहेत.

# बोगस ४९ शिक्षकांना ५० हजार पगार

### नाशिकच्या लेखाधिकाऱ्यावर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, : जळगाव जिल्ह्यात शिक्षण संस्थांत शिक्षकांची बोगस भरती करत तेथील ४४ शिक्षकांना शालार्थ आयडी देण्यात आले. तसेच दरमहा हजार रुपये वेतन शासन तिजोरीतून देण्यात आले. याप्रकरणी दीड लाख रुपये वेतन असलेल्या नाशिक शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी उदय पंचभाई व जळगाव माध्यमिक वेतन पथकाचा अधीक्षक राजमोहन शर्मा यांच्यावर गुरुवारी नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दिव्य मराठीने मार्चच्या अंकात बातमी प्रकाशित करून हे प्रकरण उघडकीस आणले होते. पदाधिकारी, मुख्याध्यापक यांच्यासोबत संगनमत करून ही फसवणूक करण्यात आल्याचे प्राथमिक तक्रारीत म्हटले आहे. रामकृष्ण अभिमन पाटील यांनी शिक्षण आयुक्तांकडे या बोगस शिक्षकांबाबत तक्रार केली होती. त्यानंतर आयुक्तांनी शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांना प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सांगितले होते.

### अधिकाऱ्यांनी पुरावे न तपासता शालार्थ आयडी कोड दिला

शालार्थ आयडी कोडसाठी वित्त अधिकाऱ्यांनी पुरावे न तपासता तो दिला. वेतन पथक अधिकाऱ्यानेही काहीही न बघता पगार सुरू केला. म्हणून दोन्ही अधिकाऱ्यांवर आरोप निश्चित करून तक्रार दिली. सध्या अंदाजे ४४ जणांचे कोड जनरेट केल्याचे प्राथमिकरीत्या समोर आले आहे, पण ही संख्या निश्चित नाही. ती वाढू शकेल.

**- भाऊसाहेब चव्हाण, विभागीय शिक्षण उपसंचालक नाशिक**

**वरिष्ठ स्तरावर चौकशी**

या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी झालेली होती. प्रकरणात माध्यमिक शिक्षण विभागाकडे कोणताही पत्रव्यवहार किंवा माहिती आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाबाबत काहीही सांगता येणार नाही असे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले होते.

या संस्थांत दिले बोगस शालार्थ आयडी, भगिनी मंडळ शिक्षण संस्था, अमळनेर., शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अमळनेर.,

महात्मा फुले शिक्षण संस्था, टाकरखेडा, अमळनेर

ग्रामीण विकास विद्या प्रसारक मंडळ, एरंडोल., र. चि. पाटील बहू शिक्षण संस्था, वावडे, अमळनेर., शिवाजी शिक्षण संस्था, कासोदा, अमळनेर., सर्वोदय शिक्षण संस्था, सिंधगव्हाण., बेलगंगा शिक्षण संस्था, बेलगंगानगर., नूतन मराठा शिक्षण संस्था, जळगाव.,प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था, कुऱ्हा काकोडा, मुक्ताईनगर

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर, ईस्ट, मुंबई येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101